# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र

सत्र–४ : पेपर क्रमांक SOE 35

# भारतातील ग्रामीण विकास

**(Rural Development in India)**

(शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१६
**तृतीय आवृत्ती :** २०१७
चतुर्थ सुधारित आवृत्ती : २०२१
एम. ए. भाग २ (सत्र ४ : भारतातील ग्रामीण विकास) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-640-7

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. सरवदे** (सदस्य सचिव)
I/c संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■**

अध्यक्ष - **डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी हार्दिक स्वागत करते. या अभ्यासक्रमात तुम्ही समाजशास्त्राचे सत्र पद्धतीनुसार एकूण आठ पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र ४ साठी पेपर क्र. SOE 35 ''भारतातील ग्रामीण विकास'' असा आहे. या पेपरमध्ये एकूण चार अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना भारतातील ग्रामीण विकासाचे यथार्थ आकलन होईल याची मला खात्री आहे.

'भारतातील ग्रामीण विकास' या पेपरमध्ये चार घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण विकास, नियोजन आणि व्यवस्थापन, भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम आणि ग्रामविकासातील प्रमुख समस्या या घटकांचा समावेश केला आहे.

शेवटी संपादक या नात्याने आम्ही सर्वप्रथम मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण केंद्राचे संचालक, अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे व अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूरशिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच आम्हाला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे आम्ही प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचे आम्ही शतशः ऋणी आहोत.

**■ संपादक ■**

**डॉ. दयावती पाडळकर**
भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव
कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,
उंब्रज, जि. सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–४<br>घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. मच्छिंद्र सकटे**<br>सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, जि. सातारा | १, २ |
| **डॉ. अर्चना जगतकर**<br>न्यू कॉलेज, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. डॉ. विजय मारुलकर**<br>समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. दयावती पाडळकर**
भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव
कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | ग्रामीण विकास : परिचय | १ |
| २. | नियोजन आणि व्यवस्थापन | १७ |
| ३. | भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम | २६ |
| ४. | ग्राम विकासातील प्रमुख समस्या | ४५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# ग्रामीण विकास : परिचय

## (Rural Development : An Introduction)

**घटक संरचना :**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ ग्रामीण विकासाची व्याख्या, संकल्पना आणि वैशिष्ट्ये

  १.२.२ ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये

  १.२.३ ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन

  १.२.४ ग्रामीण विकासातील अडथळे

१.३ सारांश

१.४ स्मरणार्थ संज्ञा

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके.


## १.० उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास;

- ग्रामीण विकास ही व्याख्या स्पष्ट करता येईल.
- ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये सांगता येतील.
- ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन स्पष्ट करता येतील.
- ग्रामीण विकासातील अडथळे स्पष्ट करता येतील.

## १.१ प्रास्ताविक :

या घटकात तुम्ही ग्रामीण विकासाचा अर्थ, ग्रामण विकासाबाबतचे दृष्टिकोन आणि ग्रामीण विकासातील अडथळे या बाबींचा अभ्यास करणार आहोत. ग्रामीण विकासाचा अभ्यास करताना ग्रामीण समाजाचे स्वरूप अभ्यासणे आवश्यक आहे. ग्रामीण समाज स्थिर नसून तो गतिशील आहे. ग्रामीण विकासाची प्रक्रिया सार्वत्रिक आहे. ग्रामीण समाजजीवनात निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाययोजना योजून ग्रामीण समाजाचा विकास सर्वांगाने घडवून आणण्यासाठी विविध स्तरांवरती प्रयत्न केले जात आहेत. याबरोबरच ग्रामीण विकासविषयक योजना, कार्यक्रम राबविण्यात येऊ लागले आहेत. यामुळे ग्रमीण समाजाचे स्वरूप बदलत आहे. या बदलापाठीमागची पार्श्वभूमी आणि ग्रामीण समाजाच्या विकासासाठी कारणीभूत असलेल्या घटकांना समजण्यासाठी ग्रामीण विकासाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## १.२ विषय विवेचन :

प्रस्तुत विषयाच्या आकलनाच्या दृष्टीने या घटकाचे पुढील चार विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या घटकात ग्रामीण विकास म्हणजे काय ते व्याख्येद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. दुसऱ्या भागात ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये स्पष्ट केलेली असून तिसऱ्या विभागात ग्रामीण विकासाबाबतचे दृष्टीकोन स्पष्ट करण्यात आलेले आहेत आणि चौथ्या विभागात ग्रामीण विकासाच्या मार्गातील अडथळे स्पष्ट करण्यात आले आहेत.

### १.२.१ ग्रामीण विकास : व्याख्या आणि संकल्पना

ग्रामीण विकासाचे पूर्णतः आकलन होण्यासाठी प्रथम ग्रामीण विकासाबाबतच्या काही विचारवंतानी केलेल्या व्याख्या अभ्यासू.

१) **कार्ल टेलर :** ''ग्रामीण विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये ग्रामीण लोक आपली आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारावी यासाठी ज्या प्रक्रियेत सहभागी होतात आणि त्यामुळे ते आपल्या राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमात काम करणारे प्रभावशाली समुह बनतात.''

२) **जी. पार्थसारथी :** यांनी ग्रामीण विकासाचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे.

''ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या निम्नवर्गातील लोकांना त्यांच्या भौतिक आणि मानवी साधनसंपत्तीचा योग्यप्रकारे उपयोग करण्याच्या संधी देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हा ग्रामीण विकासाचा निर्णायक घटक असून या घटकाशिवाय ग्रामीण साधनसंपत्तीच्या उपयोगास कार्यात्मक महत्त्व असत नाही.''

३) **योजना आयोग :** ''ग्रामीण विकास योजना ही अशी विकास पद्धती आहे की, जिच्याद्वारे पंचवार्षिक योजना खेड्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात संपूर्ण बदल घडवून आणण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा प्रयत्न करते.''

४) **जागतिक बँक आणि विकास क्षेत्रीय धोरण प्रबंध :** ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी तयार करण्यात आलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय.

यामध्ये दैनंदिन जीवनातील उदरनिर्वाहाची साधने मिळविण्यासाठी धडपडणाऱ्या गरीब लोकांपर्यंत विकास पोहचविण्याचा या व्यूहरचनेत समावेश होतो.''

वरील उल्लेखलेल्या व्याख्यांच्या आधारे ग्रामीण विकास या संकल्पनेचा अर्थ आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. ग्रामीण लोकजीवन आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सुधारण्यासाठी ग्रामीण लोकांसाठी राबविण्यात येणारी प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.

२. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांचे जीवनमान त्यांच्या क्रियाशील सहभागामधून उंचावणे म्हणजेच ग्रामीण विकास होय.

३. ग्रामीण लोकजीवनातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय इ. क्षेत्रामध्ये सुधारणा घडवून आणणे म्हणजेच ग्रामीण विकास होय.

४. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या निम्न वर्गातील लोकांपर्यंत विकासाचा लाभ पोहचविण्यासाठी तयार करण्यात आलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय.

**ग्रामीण विकासाची वैशिष्ट्ये**

वर दिलेल्या व्याख्यांच्या आधारे आपल्याला ग्रामीण विकास ही संकल्पना स्पष्ट समजते. ग्रामीण विकासाच्या संकल्पनेचे स्वरूप पूर्णतः आकलन होण्यासाठी ग्रामीण विकास प्रक्रियेच्या वैशिष्ठ्यांचा अभ्यास करणे योग्य ठरेल.

ग्रामीण विकासाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

**१) सार्वत्रिक स्वरूपाची प्रक्रिया :**

भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण भागाचा विकास हा खऱ्या अर्थाने देशाचा विकास असून ग्रामीण समाजात आवश्यक असलेल्या सुधारणा घडवून आणणारी ही प्रक्रिया असून ती सार्वत्रिक स्वरूपाची आहे. साधारणतः सर्व समाजांचे ग्रामीण आणि नागरी असे दोन प्रमुख भाग आढळतात. नागरी भागापेक्षा ग्रामीण भाग हा मागासलेला आहे. शहरातील वाढते औद्योगिकरणांमुळे रोजगाराच्या संधीची उपलब्धता शहरांमध्येच पहायला मिळते. याउलट ग्रामीण भागात दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, अज्ञान, अनारोग्य, अस्वच्छता, अंधश्रद्धा यासारख्या समस्या निर्माण झाल्या असून या समस्यांच्या निवारणासाठी आणि ग्रामीण लोकजीवन सुधारण्यासाठी विविध उपक्रम, प्रकल्प, योजना राबविल्या जात आहेत. त्यामुळे ग्रामीण विकास ही सार्वत्रिक स्वरूपाची प्रक्रिया आहे असे म्हणणे सार्थ ठरते.

**२) सर्वांगीण विकासाभिमुख प्रक्रिया :**

ग्रामीण समाजाच्या विकास प्रक्रियेत समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत समाविष्ठ आहे. प्रारंभीच्या

कालखंडात ग्रामीण विकासाचे स्वरूप यामध्ये ग्रामीण लोकांच्या जीवनात आर्थिक सुधारणा करणे या बाबीशी निगडीत होते. म्हणून ग्रामीण विकासात केवळ कृषी आणि कृषीपुरक व्यवसाय उदा. पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इ. व्यवसाय याबरोबरच ग्रामीण भागात चालविले जाणारे ग्रामोद्योग, लघु तसेच कुटीरोद्योग यांचा विकास करून ग्रामीण लोकांसाठी रोजगाराच्या संधीमध्ये वाढ करणे आणि त्याद्वारे उत्पन्न वाढविणे या आर्थिक बाबींशी ग्रामीण विकास निगडीत असे. परंतु अलिकडे ग्रामीण विकासाचा अर्थ ग्रामीण लोकजीवनातील आर्थिक बाबींपुरताच मर्यादित न राहता तो सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय बाााबींशी निगडीत आहे व त्याचा अर्थ दिवसेंदिवस व्यापक बनत आहे. याशिवाय शैक्षणिक सुविधा, शुद्ध पाणी, आरोग्य विषयक सुविधा, सकस अन्न, राहण्यासाठी उत्तम घरांची सोय, वाहतुकीची साधने यांचाही अंतर्भाव ग्रामीण विकास या संकल्पनेत करण्यात आला आहे. तसेच लोकाचार, परंपरा, रूढी इ. सांस्कृतिक घटकांमध्ये परिवर्तन करून नवे तंत्रज्ञान, आचार-विचार, परंपरांचा स्विकार करण्याबाबतचे प्रबोधन करणे या बाबींचा समावेश सध्या ग्रामीण विकासात होऊ लागला आहे. ग्रामीण विकासाबाबतच्या विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी भारतातील समुदाय विकास कार्यक्रम (C.D.P.) Community Development Programme आणि एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) - Integrated Rural Development Project याद्वारे घडवून आणला जातो.

### ३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल समूहाच्या विकासावर भर :

ग्रामीण समाजाच्या विकासामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांच्या समूहाचा विकास करण्यावर विशेष भर देण्यात येतो. यामध्ये आर्थिकदृष्ट्या निम्नवर्गातील लोक, अल्पभूधारक, भूमीहीन, जमीन कसणारी कुळे यांचा अंतर्भाव होतो. ग्रामीण भागातील या घटकांच्या जीवनाचा आर्थिक स्थर उंचावणे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतात. प्राचीन काळापासून भारतीय समाजातील अनुसुचित जाती, जमाती, इतर मागासवर्गावरील विविध निर्बंधामुळे त्यांचा विकास होऊ शकलेला नाही. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत या घटकांच्या विकासविषयक योजना राबविल्या जात आहेत. याबरोबरच महिला आणि वयोवृद्ध घटकांच्या विकासाचाही समावेश ग्रामीण विकासामध्ये समाविष्ठ करण्यात आला आहे.

### ४) सक्रिय लोकसहभाग :

सक्रिय लोकसहभागाशिवाय ग्रामीण विकास पूर्ण करता येऊ शकणार नाही. ग्रामीण विकासाच्या निरनिराळ्या योजना आणि विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सक्रिय लोकसहभाग वाढविण्यासाठी त्रिस्तरीय पंचायत राज्यव्यवस्था निर्माण करण्यात आली असून यामार्फत ग्रामीण लोकांना उत्पन्नाची साधने आणि अधिकाराबरोबरच सत्ता देण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या मानवी साधनसंपत्तीचा पर्याप्त उपयोग करून मनुष्यबळाची गुणवत्ता वाढविण्यावर भर देण्यात येतो. याबरोबरच लोकांमध्ये विकासाची प्रेरणा निर्माण करणे, त्यांचे प्रबोधन करून ग्रामीण विकासात त्यांना सक्रिय बनविणे, लोकांमध्ये ग्रामीण विकासाच्या सहभागातील नेतृत्व कौशल्य निर्माण करणे गरजेचे असते. ग्रामीण विकास हा पायाभूत संरचनेच्या विकासापेक्षा लोकविकासाभिमूख असण्यासाठी ग्रामीण विकासात लोकसहभाग अनिवार्य आहे.

### ५) अखंड चालणारी प्रक्रिया :

समाज गतिशील आहे. त्यामुळे बदलत्या काळानुसार ग्रामीण समाजात अनेक बदल होत आहेत. या परिवर्तनाबरोबरच ग्रामीण समाजात नव्या गरजा, नव्या समस्या, आणि प्रश्न निर्माण होत आहेत. त्यामुळे नव्याने होऊ घातलेल्या समस्यांच्या निराकरणासाठी वेगवेगळे विकासात्मक, नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविले जातात. म्हणून ग्रामीण विकास ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे.

### ६) देशविकासाचे महत्त्वपूर्ण अंग :

भारत हा खेड्यांचा देश आहे. कारण भारतात शहरांच्या तुलनेत खेड्यांची संख्या अधिक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या कालखंडात भारतातील ८०% लोकांचे खेड्यात वास्तव्य होते. म्हणूनच महात्मा गांधीजींनी देशाचा खरा विकास म्हणजे खेड्यांचा विकास असे विचार मांडून देशाचा खरा विकास करायचा असेल तर खेड्याकडे चला असा उपदेश लोकांना केले. कारण ग्रामीण भागात जमीन, हवा, पाणी, सुर्यप्रकाश यासारख्या साधनसंपत्तीचा भरपूर स्तोत्र ग्रामीण भागात आढळून येतो. भारतासारख्या विकसनशील देशाच्या विकासाच्या दृष्टीने या नैसर्गिक संसाधनाचा वापर देशविकासात महत्त्वाची भूमिका बजावतो. या अनुषंगाने देशविकासाचे ग्रामीण विकास हे अविभाज्य अंग ठरते आहे.

### ७) शासकीय भूमिका :

देशाच्या विकासामधील महत्त्वपूर्ण आणि अविभाज्य असे ग्रामीण विकासाचे महत्त्वपूर्ण अंग म्हणजे ग्रामीण विकासातील शासनाची भूमिका होय. यादृष्टीने ग्रामीण विकासाची धोरणे आणि कार्यक्रमांची आखणी करून त्यांच्या अंमलबजावणीसाठी शासकीय यंत्रणेबरोबरच आर्थिक मदतीची तरतूद करणे गरजेचे असते. अशा कामामध्ये शासन राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या संघटनांची, विचारवंत, समाजसुधारक इ. चे मार्गदर्शन आणि सल्ला घेत असते. यासाठी या सर्व प्रक्रियेत शासनाची भूमिका आद्य आणि निर्णायक असते.

## १.२.२ ग्रामीण विकास : उद्दिष्ट्ये

ब्रिटीश कालखंडात ग्रामीण समाजाची सर्वात मोठी हानी घडून आली होती. त्यामुळे समाजात नव-नविन प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या. या समस्या सोडविण्यासाठी शास्त्रज्ञ, विचारवंतानी ग्रामीण समाजाच्या पुनर्रचनेबाबत काही विचार मांडले आणि त्याआधारे ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली. त्या उद्दिष्टांचे पुढील दोनप्रकारे वर्गीकरण करण्यात आले आहे.

अ) ग्रामीण विकासाला पूरक आणि आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा पुरविणे.

ब) ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करणे.

याव्यतिरिक्त ग्रामीण विकासाबाबतची उद्दिष्ट्ये

या संस्थेद्वारे पुढील उद्दिष्ट्ये सांगण्यात आली आहेत.

१) ग्रामीण समाजातील लोकांच्या श्रमशक्तीला आणि विधायक शक्तीला ग्रामीण विकासातील आर्थिक क्रियांना मुख्य प्रवाहात समाविष्ठ करणे.

२) ग्रामीण लोकांचे शहराकडे होत असलेल्या स्थलांतरावर नियंत्रण ठेवणे.

३) ग्रामीण समाजातील स्त्रिया, पुरुष, तरुण यांचा ग्रामीण विकासातील सहभाग वाढविणे.

४) ग्रामीण विकासामधून पर्यावरणाची गुणवत्ता आणि ग्रामीण लोक जीवनाची गुणवत्ता सुधारणे.

५) ग्रामीण समाजातील मनुष्यबळाचा सर्वांगीण विकास साधणे. ग्रामीण विकासाच्या उद्दिष्ट्यांचा व्यापक दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे-

**१) रोजगारामधून आर्थिक उत्पन्न वाढविणे**

भारतीय ग्रामीण लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. परंतु भारतीय शेती ही मान्सुनच्या अनियमित पावसावर अवलंबून असल्याने ती हंगामी आणि मागासलेली आहे. यासाठी ग्रामीण शेतीमध्ये अद्ययावत तंत्रे, खते, जंतुनाशके, मुबलक पाणी इ. सुविधा उपलब्ध करून शेती उत्पादन वाढविणे हे ग्रामीण विकासाचे मुलभूत उद्दिष्ट ठरते. याबरोबरच शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी यांना वर्षभर उपलब्ध होईल असा रोजगार निर्माण करून त्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. अैद्योगिकरणामुळे ग्रामीण समाजामधील हस्तव्यवसाय, बिगरशेती व्यवसाय बंद पडल्याने ग्रामीण लोकांची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय बनत आहे. यासाठी ग्रामीण भागात रोजगारांची निर्मिती करून त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण रोजगारात वाढ करताना शेती आणि शेतीशी पूरक व्यवसाय जसे की पशूपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशी पालन, मत्स्य पालन, रेशीम उत्पादनासाठी रेशमी किड्यांचे पालन यासारखे रोजगार ग्रामीण भागात निर्माण करून रोजगारातून उत्पन्न वाढविणे आणि ग्रामीण लोकांच्या दारिद्र्याचे निर्मूलन करणे.

**२) ग्रामीण लोकांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करणे**

गामीण विकासामध्ये सुशिक्षित, सुजाण, जागृत, डोळसवृत्तीच्या लोकांचा सहभाग आवश्यक असतो. परंतु ग्रामीण भागात शैक्षणिक सोयींचा अभाव असल्यामुळे बहुसंख्य ग्रामीण लोक निरक्षर आणि अंधश्रद्धाळू आहेत. ग्रामीण लोकांना अधिका-अधिक साक्षर बनविण्यासाठी अंगणवाडी, बालवाडी, शाळा, हायस्कूल, महाविद्यालयांमार्फत शिक्षणाचा प्रसार करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. याबरोबरच ग्रामीण युवकांना साक्षर करण्यासाठी साक्षरता प्रसारकेंद्रे, प्रौढशाळा, रात्रशाळांची निर्मिती करून ग्रामीण युवकांच्या कला-कौशल्याचा विकास करणे. अशाप्रकारे विविध प्रकारे शैक्षणिक प्रसार करून ग्रामीण लोकांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**३) आरोग्याचा दर्जा सुधारणे**

बहुतांशी ग्रामीण लोक निरक्षर आहेत. निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा आरोग्य सुविधांचा अभाव, स्वच्छतेच्या सवयींबाबत उदासिनता यामुळे ग्रामीण लोकांच्या आरोग्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. ग्रामीण लोकांचे

आरोग्य सुधारण्यासाठी ग्रामीण आरोग्य केंद्रे, लसीकरण तसेच कुटुंब कल्याण केंद्रे, प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी, औषधे इ. चा. पुरवठा करणे याबरोबरच शौचालये, सांडपाणी इ. च्या सोयी पुरविणे, शुद्ध पाणी, आरोग्याबाबत घ्यावयाच्या दक्षता, स्वच्छतेच्या सवयी इ. द्वारे ग्रामीण लोकांचे शारीरिक, मानसिक दृष्ट्या निरोगी मनुष्यबळाची निर्मिती करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे.

**४) तंत्रज्ञान, वहतूक आणि दळणवळणाची साधने यांची निर्मिती करणे**

ग्रामीण समाजात पक्के रस्ते, वीज आणि पाणी इ. पायाभूत सुविधांचा पुरवठा करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागात वाहतूक विषयक सुधारणा करून ग्रामीण लोकांचा बाह्य जगाशी घनिष्ठ संबंध तयार करण्याच्या दृष्टीने आवश्यक गरजांचा पुरवठा करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे.

**५) पर्यावरण संरक्षक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे**

ग्रामीण समाज हा शेती प्रधान समाज आहे. शेती पर्यावरणाशी अधिका-अधिक निगडीत आहे. शेतीच्या बहुतांशी गरजांची पूर्तता ही निसर्गातच होत असते. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण हे संपूर्ण मानवी समाज आणि शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने मृदासंधारण, पाणलोट क्षेत्राची निर्मिती आणि विकास, वृक्षारोपण, गुरांसाठी चाऱ्याची लागवड इ. उपक्रम राबवून पर्यावरणाचे संरक्षण केले जाते. पर्यावरण विकासात्मक कार्यक्रमामुळे जमीन, पाणी आणि पिकांची गुणवत्ता राखण्यास मदत होते.

**६) सामाजिक विषमता नष्ट करणे**

ग्रामीण समाजातील पारंपारिक जातीभेदांमुळे सामाजिक विषमता असल्याची आपल्याला पहावयाला मिळते. ग्रामीण समाजातील ही पारंपारिक जातीय विषमता, आर्थिक तसेच सामाजिक विषमता नष्ट करून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या लोकशाही मूल्यांवर आधारित असलेली समाजव्यवस्था निर्माण करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. यादृष्टीने ग्रामीण भागात निरनिराळ्या विकास कार्यक्रमांचे आयोजन करून समाजातील गरीब, श्रीमंत असा वर्गावर्गामधील भेद कमी करणे याबरोबर सवर्ण-अस्पृश्य असा भेदभाव नष्ट करणे अंधश्रद्धांचे अनिष्ट परंपराना पायबंद घालून समाजात आरोग्यदायी वातावरणाची निर्मिती करणे, ग्रामीण समाजातील स्त्री-पुरूष भेद कमी करून महिलांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

**७) शास्त्रीय ज्ञानावर आधारीत ग्रामीण जीवनाची उभारणी करणे**

ग्रामीण लोकजीवनात साध्या तंत्रपद्धतीचा वापर केला जातो. दैनंदीन जीवनात साधे तंत्रज्ञान वापरून ग्रामीण लोक आपल्या जीवनातील साधेपणा जपत असतात. या ग्रामीण समाजाचे आधुनिक समाजात रूपांतरण करण्यासाठी सामाजिक घडामोडी पाठीमागील कारणे, कोणत्याही घटनेची कार्यकारण मीमांसा शास्त्रीय पद्धतीने करणे, उत्पादन प्रक्रियेत आणि दैनंदीन जीवनात अधिका-अधिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण जीवन सुखमय बनविणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. याबरोबरच आजारपणात मांत्रिकाकडून गंडे, दोरे यासारखे उपचार न करता प्रशिक्षित डॉक्टरांकडून औषधोपचार घेणे घरगुती वापरासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करण्याबाबत ग्रामीण लोकांचे उद्बोधन करणे, जसे की, चुल, गॅस ऐवजी सौरचूल, सौरबंब, गोबरगॅस यांचा वापर करणे.

ग्रामीण लोकांना आरोग्यविषयक चांगल्या सवयी लावणे याबाबत उद्‌बोधनपर कार्यक्रम घेऊन ग्रामीण समाजजीवन हे पारंपारिक भोळ्या समजुतीऐवजी शास्त्रीय ज्ञानावर आधारीत बनविणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे.

**८) विविध संस्था आणि संघटनांची स्थापना करणे**

ग्रामीण समाजात परस्पर सहकार्याची भावना निर्माण करून ग्रामीण समुदायाचा विकास करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. याअनुषंगाने ग्रामीण भागात वाचनालये, तरुण मंडळे, क्रिडा मंडळे, महिला मंडळे, शेतकरी मंडळे, विविध प्रकारच्या सहकारी, वित्त संस्था, पतसंस्था इ. संस्था आणि संघटना निर्माण करून संघटीत शक्तीद्वारे ग्रामीण समाजाचा विकास करणे हे उद्दिष्ट आहे.

अशाप्रकारे ग्रामीण भागातील लोकांच्या शक्ती आणि क्षमतांचा विकास लोकसहभागाद्वारे करून ग्रामीण लोकांच्या जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, संस्कृतिक आणि मानसीक अशा सर्व पैलूंचा समतोल विकास करणे हे ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**१.२.३ ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन** (Approaches to the Rural Development)

ग्रामीण विकासाची प्रक्रिया अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. दैनंदीन ग्रामीण जीवनातील समस्या सोडवून ग्रामीण लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी विविध कार्यक्रम, उपक्रम राबविले गेले आहेत. यामधून ग्रामीण विकास विषयक दृष्टीकोन रूढ झालेले आहेत ते पुढीलप्रमाणे–

१) बहुउद्देशीय दृष्टीकोन

२) किमान पॅकेज दृष्टीकोन

३) लक्ष्य समूह दृष्टीकोन

४) क्षेत्र विकास दृष्टिकोन

५) एकात्मिक विकास दृष्टिकोन

**१) बहुउद्देशीय दृष्टिकोन** (Multi-Purpose Approach)

बहुउद्देशीय दृष्टिकोन हा ग्रामीण विकासाचा एक प्रमुख आणि महत्त्वाचा दृष्टिकोन आहे.

बहुउद्देशीय दृष्टिकोन म्हणजे ज्या दृष्टिकोनात एकाच वेळी एकापेक्षा अधिक उद्दिष्ट्चे साध्य करण्यावर भर दिला जातो. त्यास बहुउद्देशीय दृष्टिकोन असे म्हणतात.

या दृष्टिकोनानुसार ग्रामीण लोकजीवनाची विविध क्षेत्रे ही परस्परावलंबी असल्याने त्यांचा एकावेळी विकास करणे हे फायदेशीर ठरते. भारतात, ग्रामीण विकासासाठी हा दृष्टिकोन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्विकारण्यात आला. दि. ०२ ऑक्टोबर १९५२ रोजी सुरू करण्यात आलेला समुदाय विकास कार्यक्रम हा बहुउद्देशीय दृष्टिकोनावर आधारलेला होता. या कार्यक्रमामध्ये कृषी विकास, ग्रामीण भागात उद्योगांची स्थापना, साक्षरता

प्रसार, आरोग्य सुविधांचा विस्तार, मंडळे, संस्था तसेच पायाभूत सेवा आणि सुविधांची निर्मिती करणे इ. उद्दिष्ट्ये एकाचवेळी साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो.

या दृष्टिकोनाचे काही सामान्य फायदे आणि तोटे (मर्यादा) पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहेत.

**फायदे :**

१) बहुउद्देशीय ग्रामीण विकासाबाबतच्या दृष्टिकोनामुळे वेळ, श्रम, पैसा याची बचत होते. कारण या विकास दृष्टिकोनामुळे ग्रामीण विकासातील एकाच वेळी अनेक उद्दिष्टे पूर्ण करण्यावर भर देण्यात येतो.

२) ग्रामीण जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात विकासविषयक समतोल निर्माण होण्यास मदत होते.

३) याबरोबरच ग्रामीण लोकांमध्ये विकासाबाबत संपूर्ण जाणीवजागृती निर्माण होऊ शकते.

**बहुउद्देशीय दृष्टिकोनाच्या मर्यादा –**

१) बहुउद्देशीय दृष्टिकोनाद्वारे ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. भांडवलांची पर्याप्तता पुरेशी नसल्यामुळे नियोजित विकास योजना पूर्ण होऊ शकलेल्या नाहीत.

२) या योजनांचे स्वरूप व्यापक असल्यामुळे यांची अंमलबजावणी करण्यात अडथळे निर्माण होतात. कारण एकाचवेळी अनेक उद्दिष्टे पूर्ण करण्यावर भर देण्यात आल्यामुळे योजनांवर लक्ष देणे अवघड होते. त्यामुळे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत.

२) **किमान पॅकेज दृष्टिकोन** (Minimum Package Approach)

किमान पॅकेज दृष्टिकोन हा अत्यंत मर्यादित स्वरूपाचा आहे. बहुउद्देशीय दृष्टिकोनाच्या मर्यादांना विचारात घेऊन त्यामधून मार्ग काढण्याच्या उद्देशाने किमान पॅकेज दृष्टिकोन स्विकारण्यात आला. किमान पॅकेज दृष्टिकोन म्हणजे, ग्रामीण जीवनाच्या विशिष्ट अशा एकाच पैलूवर किंवा विशिष्ट अशा अंगावर लक्ष केंद्रीत केले जाते व त्या अंगाचा किंवा पैलुच्या सर्वांगीण विकास घडवून आणला जातो. त्या दृष्टीकोनास किमान पॅकेज दृष्टिकोन असे म्हणतात. उदा. ग्रामीण भागातील कृषी व्यवसायाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा जसे की खते, बी-बियाणे, अवजारे, जंतूनाशके इ. चा एकत्रित स्वरूपात पुरवठा करून शेतीचा विकास घडवून आणला जातो.

''प्रकर्षित कृषी जिल्हा कार्यक्रम'' (Intensive Agricultural District Programme-IADP) ह्या कार्यक्रमाचे आयोजन १९६०-६१ मध्ये या दृष्टिकोनानुसार करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाद्वारे शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी निवडक क्षेत्रांवर भर देण्यात आला होता.

**फायदे :**

या दृष्टिकोनानुसार शेतीच्या निवडक क्षेत्रावर लक्ष दिले गेल्यामुळे त्या क्षेत्राचा मुबलक विकास होऊ शकतो.

**मर्यादा :**

या दृष्टिकोनाच्या मर्यादा विचारात घेता असे दिसून येते की केवळ एकाच क्षेत्राच्या विकासावर भर दिल्याने इतर क्षेत्रांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे विविध क्षेत्रात असमतोल असणारा विकास होऊ शकतो.

**३) लक्ष्य समूह दृष्टिकोन** (The Target Group Approach)

या दृष्टिकोनाला विशेष असे महत्त्व आहे. लक्ष्य समूह दृष्टिकोन म्हणजे, ग्रामीण समाजातील एखाद्या विशिष्ट समूहाचा किंवा गटाचा विकास घडवून आणण्यावर ज्या दृष्टिकोनात भर दिला जातो त्यास लक्ष समूह दृष्टिकोन असे म्हणतात.

या दृष्टिकोनानुसार ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, छोटे शेतकरी, महिला बालके, शेतमजूर यांच्यापैकी एखाद्या समुहाची निवड करून त्यांच्या विकासावर भर देणे या दृष्टिकोनात समाविष्ठ आहे.

**लक्ष्य समूह दृष्टिकोनावर आधारीत कार्यक्रम**

भारतात लघुशेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांसाठी ''सीमांत शेतकरी व शेतमजुर विकास अभिकरण'' (Marginal Farmers and Agricultural Laboures Development Agency MFAL) ही योजना १९७०-७१ मध्ये सुरू करण्यात आली. लहान सुधारकांसाठी ''लहान शेतकरी विकास अभिकरण'' (Small Farmers Development Agency-SFDA) ही योजना सुरू करून ग्रामीण भागातील १८ ते ३५ वयोगटातील युवकांसाठी TRYSEM ही योजना सुरू करण्यात आली. याबरोबरच ''ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम'' RLEGP हा कार्यक्रम या दृष्टिकोनावर आधारीत होते.

**फायदे :**

लक्ष्य समूह दृष्टिकोनामुळे, विकासाच्या दृष्टिने मागास असलेल्या ग्रामीण समूहाचा विकास होऊन त्यांना विकसीत घटकांच्या बरोबरीने आणण्याच्या संधीत वाढ करणे. त्यामुळे समाजात सामाजिक समता आणि न्याय प्रस्थापित होण्यास मदत होते.

**तोटे :**

लक्ष्य समूह दृष्टिकोनानुसार एकाच समुहावर लक्ष केंद्रित केल्यामुळे समाजातील इतर समुहांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. त्यामुळे इतर घटकांच्या मनात वंचिततेची भावना निर्माण होण्याची शक्यता अधिक बळावते.

### ४) **क्षेत्र विकास दृष्टिकोन** (Area Development Approach)

या दृष्टिकोनानुसार अविकसीत क्षेत्राचा विकास घडवून आणणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आलेले असते.

एखाद्या क्षेत्राचा विकास झाल्यानंतर त्याचे फायदे काही कालावधीनंतर त्या क्षेत्रातील निम्न स्तरांपर्यंत हळु-हळू झिरपत जातात. आणि क्षेत्रीय विकासाचा फायदे समाजातील सर्व स्तरांपर्यंत जाऊन पोहचतात.

इ.स. १९७९ मध्ये भारत सरकारने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना दुष्काळाच्या वेळी पुरेसे अन्नउत्पादन मिळावे म्हणून ''अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम'' (Drought Prone Area Programme DPAP) सुरू केला होता. याच आधारावर आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने ''आदिवासी क्षेत्र उपाययोजना'' (Tribal Area Subplan) हा कार्यक्रम सुरू करण्यात आला होता.

**फायदे :**

या दृष्टिकोनामुळे विशिष्ट क्षेत्रांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. निवड करण्यात आलेल्या भागाच्या विकासासाठी सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.

**तोटे :**

या दृष्टिकोनाच्या साह्याने विकास घडवून आणण्यामध्ये देशात समाविष्ठ असणाऱ्या एकूण अविकसीत क्षेत्रांपैकी काहीच अविकसीत क्षेत्रावर साधनसंपत्तीचा खर्च करण्यात येतो. या दृष्टिकोनावर आधारलेला विकास हा अत्यंत महत्त्वकांक्षी असल्याने या दृष्टिकोनानुसार अंमलबजावणी करण्यासाठी नेटक्या आणि ध्येयवादी नेतृत्वाची गरज असते. पण असे नेतृत्व सहजासहजी उपलब्ध होऊ शकत नसल्याने अशा दृष्टिकोनानुसार विकास करणे आव्हानात्मक ठरते.

### ५) **एकात्मिक विकास दृष्टिकोन** (Integrated Development Approach)

ग्रामीण विकासाबाबत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम प्रकल्प इ. एकीकरण ज्या दृष्टिकोनात केले जाते त्या दृष्टिकोनास एकात्मिक विकास दृष्टिकोन असे म्हणतात. या ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनानुसार ग्रामीण विकासाच्या कृषी, कृषीपुरक, ग्रामीण उद्योग, ग्रामीण हस्तउद्योग, ग्रामीण श्रमीकांसाठी कौशल्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन इ. नाविन्यपूर्ण घटकांच्या एकत्रित विकासावर भर देण्यात येतो.

एकात्मिक दृष्टिकोनानुसार पार पाडली जाणारी कार्ये

ग्रामीण विकासाच्या निरनिराळ्या पैलुंवर भर देण्यात येत असल्यामुळे पार पाडली जाणारी कार्ये नाविन्यपूर्ण असतात. यामध्ये

१) ग्रामीण भागातील विविध प्रकारच्या साधनसंपत्तीची यादी बनविणे.

२) ग्रामीण विकास योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थी कुटुंबाच्या नोंदी ठेवणे.

३) ग्रामीण विकास कार्यक्रमात लोकांना समाविष्ठ करून घेणे.

भारतात इ.स. १९७८ मध्ये एकात्मिक विकास दृष्टिकोन यावर आधारलेला ''एकात्मक ग्रामीण विकास'' (Integrated Rural Development Programme-IRDP) हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. या उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील लोकांना वित्तपुरवठा करून स्वयंरोजगाराद्वारे त्यांच्या अर्थोत्पन्नात वाढ करणे व त्यांना दारिद्र्यरेषेवर आणणे हा या उपक्रमाचा हेतू होता. या दृष्टिकोनाचे स्वरूप व्यापक असल्यामुळे ग्रामीण विकासाच्या सर्व पैलुंवर एकात्मिक स्वरूपात लक्ष देण्यात येते. परंतु याबरोबरच एकात्मिक विकास दृष्टिकोनाच्या अंमलबजावणीबाबत संभ्रम निर्माण करणारी आहे. कारण हा दृष्टिकोन ग्रामीण लोकांच्या दृष्टिकोनापेक्षा शहरी लोकांच्या गरजांना पूर्तता करण्यावर भर देतो.

**१.२.४ ग्रामीण विकासातील अडथळे** (Obstacles to Rural Development)

ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनांचा अभ्यास केल्यानंतर ग्रामीण विकासाच्या मार्गातील अडथळे कोणते आहेत याचा अभ्यास करणार आहोत. ग्रामीण विकास कार्यक्रमांवर आजपर्यंत बराच खर्च करण्यात आला. परंतु या खर्चाच्या मानाने ग्रामीण विकास घडून आला नाही. कारण ग्रामीण विकासाच्या मार्गात अनेक अडथळे आहेत. या सर्व अडथळ्यांचा विचार करता यांचे वर्गीकरण पुढील तीन प्रकारात करता येते.

अ) आर्थिक स्वरूपातील अडथळे

ब) राजकीय, प्रशासकीय स्वरूपातील अडथळे.

क) सामाजिक-सांस्कृतिक स्वरूपातील अडथळे.

**अ) आर्थिक स्वरूपातील अडथळे** (Economic Factors)

**१) भांडवलांचा अभाव**

ग्रामीण विकासातील आर्थिक घटक हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण विकासामध्ये कृषी विकास करणे, ग्रामीण उद्योग, लघु-कुटीरोद्योगास प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागात मूलभूत सुविधांचा पुरवठा करणे, शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे याबरोबरच आरोग्य विषयक सुविधा पुरविणे यासारखे विविध उपक्रमशील कार्यक्रम राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज असते. परंतु आपल्या भारतासारख्या विकसनशील देशाकडे अपुऱ्या भांडवलामुळे ग्रामीण विकासात अडथळे येतात.

**२) नैसर्गिक साधनसंपत्ती वापराबाबतचे अज्ञान**

ग्रामीण भागात नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात आढळते. जमीन, पाणी, वने, पर्वत, खनिज संपत्ती, जीवसृष्टी इ. नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता नैसर्गिक भागात जरी विपुल प्रमाणात असली तरी यांचा पुर्णतः वापर केला जात नाही. याबरोबरच वरील साधनसंपत्तीचा दुरुपयोग देखील केला जातो. तर कधी त्यांचा अविवेकी वापरही करण्यात येतो. उदा. हजारो हेक्टर्स जमीन पडितच ठेवली जाते. पावसाचे पाणी धरणांमध्ये अडवून न ठेवणे, जंगलांची अविवेकी केली जाणारी जंगलतोड, सौरशक्तीच्या वापराबाबत अज्ञान इ. वरील साधनसंपत्तीचा पुरेसा वापर न केल्यामुळे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

**३) विकास कामांपेक्षा विकासेत्तर कामावर अधिक खर्च**

ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत करण्यात येणाऱ्या विकासापेक्षा प्रक्रिया राबविणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार त्यांचे भत्ते, वाहन-सामुग्री, विकास प्रक्रियांसाठी देण्यात येणारे अनुदान इ. बाबींवर अधिक पैसा खर्च करण्यात येतो. त्यामुळे विकास कामांसाठी पुरेसे अर्थसहाय्य मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण विकासात अडथळे येतात.

**ब) राजकीय-प्रशासकीय स्वरूपातील अडथळे** (Political-Administrative Factors)

**१) शासकीय उदासिनता :** ग्रामीण विकासविषयक योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. परंतु ग्रामीण विकासाबाबत शासकीय कर्मचाऱ्यांकडे आत्मियता, निष्ठा, प्रामाणिकपणा इ. नसल्याने ग्रामीण विकासाचे कार्यक्रम यशस्वीपणे राबवले जात नाहीत.

**२) भ्रष्टाचार :** ग्रामीण विकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे भ्रष्टाचार होय. ग्रामीण विकासातील सहभागी पदाधिकारी, आणि सरकारी नोकर, कर्मचारी हे कधी वैयक्तिक तर कधी परस्परांच्या सहकार्याने ग्रामीण विकासामधील भ्रष्टाचारात सामील होतात. ग्रामीण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडण्यात स्वयंसेवी संस्था आणि बिगरशासकीय संघटना महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असतात. परंतु सहभागी सर्व संघटना प्रामाणिकपणे काम पार पाडत नाहीत. विकासासाठी देण्यात येणाऱ्या निधिचा गैरवापर करतात. अशाप्रकारे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला जातो.

**३) राजकारण :** ग्रामीण विकासातील राजकारण हे स्वार्थी आणि संकुचित स्वरूपाचे असून ते ग्रामीण विकासात मोठा अडथळा बनत आहे. स्वार्थी राजकारणामुळे शासकीय विकास योजनांना राजकीय मंडळी विरोध करतात. ग्रामीण भागातील परस्पर विरोधी राजकीय गट, धर्म, प्रांत, भाषा यावर आधारलेले राजकारण करतात. अशा राजकारणामध्ये ग्रामीण विकास दुर्लक्षित केला जातो आणि केवळ सत्ता आणि संपत्ती मिळविण्यासाठी संघर्ष केला जातो.

**क) सामाजिक-सांस्कृतिक घटक**

ग्रामीण विकासात अडथळा ठरणाऱ्या वरील घटकांबरोबर सामाजिक सांस्कृतिक घटकांचाही समावेश होतो.

**१) लोकसंख्या वाढ :** भारतासारख्या विकसनशील लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. हा ग्रामीण विकासातील प्रमुख अडथळा बनत आहे. कारण वाढती लोकसंख्या आणि विकास यांचे व्यस्त गुणोत्तर असल्यामुळे सतत वाढणाऱ्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी अधिक विकास निधीची गरज असते. वाढत्या लोकसंख्येच्या शिक्षण, आरोग्य यासारख्या पायाभूत सुविधांचा पुरवठा करताना विकास निधी कमी पडतो. त्यामुळे विकासाची प्रक्रिया मंद होते.

**२) गुणवत्तापूर्ण मानवी साधनसंपत्तीचा अभाव :** कोणत्याही विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक आणि नैसर्गिक साधनांची गरज ज्याप्रमाणे असते त्याप्रमाणेच गुणवत्तापूर्ण मानवी साधनसंपत्तीची ही नितांत गरज

असते. परंतु ग्रामीण भागातील लोक हे निरक्षर, अंधश्रद्धाळू, रूढी-परंपरांना चिकटून बसणारे आहेत. याबरोबरच त्यांनी विज्ञान आणि तांत्रिक ज्ञान यामधील कौशल्ये शिकून आत्मसात केली नसल्याने ते दारिद्री आणि मागासलेला दृष्टिकोन असणारे आहेत. ग्रामीण विकासासाठी अशा गुणवत्ता नसलेल्या साधनसंपत्तीमुळे ग्रामीण विकास म्हणावा तसा होऊ शकत नाही.

**३) विकास प्रक्रियेतील लोकसहभाग आणि समाजसेवकांचा अभाव :** लोकसहभागाशिवाय ग्रामीण विकास प्रक्रिया अपूर्ण असते. लोकांच्या अज्ञानामुळे तर कधी-कधी जाणीवपूर्वक ग्रामीण लोक विकासाच्या प्रक्रियेपासून अलिप्त राहतात. विकासाचे काम हे शासनाचे काम आहे. या मताकडे त्यांचा कल असतो. इ. स. १९५२ मध्ये भारतात सुरू करण्यात आलेला समुदाय विकास कार्यक्रम लोकांच्या अपेक्षित सहभाग नसल्यामुळे अपयशी ठरण्यात आला होता. याबरोबरच आजच्या आधुनिक काळात तळमळीने आणि निष्ठेने काम करणारे सेवक आणि संस्थांचा, संघटनांचा अभाव आहे. आजच्या समाजसेवकांमध्ये ग्रामीण विकासाबाबतची तळमळ, निष्ठा नसून समाजसेवा त्यांच्यासाठी राजकारणात येण्याची संधीच आहे असे ते मानतात. त्यामुळे समाजसेवा त्यांच्यासाठी स्वार्थ साधण्याचा धंदा बनला आहे. अशी लोकांची वृत्ती ग्रामीण विकासात अडथळा बनत आहे.

**४) परिवर्तनाला विरोध करण्याची मानसिकता :** ग्रामीण लोक रूढी-परंपरांना मानणारे आहेत. जुने रिती-रिवाज यांना चिकटून राहणारे असून जुने ते सोने मानण्याकडे त्यांचा अधिक कल असतो. अशा परिस्थितीत नवीन ज्ञान, मूल्ये, विचार यांना ते विरोध करतात. जुन्या विचार परंपरांना चिकटून राहून नव्या विचारांना विरोध करण्याची मानसिकताच ग्रामण विकासातील मोठा अडथळा बनत आहे.

## १.३ सारांश :

ग्रामीण विकास या घटकात ग्रामीण विकासाची संकल्पना, ग्रामीण विकासाचा अर्थ आणि व्याख्या यांचा अभ्यास केल्यानंतर तुम्ही ग्रामीण विकासाच्या पुढील वैशिष्ट्यांचा आढावा घेतला- १) ग्रामीण विकासाची प्रक्रिया सार्वत्रिक स्वरूपाची आहे. २) सर्वांगीण विकासाभिमुख प्रक्रिया, ३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल समूहाच्या विकासावर भर, ४) सक्रिय लोकसहभाग, ५) अखंड चालणारी प्रक्रिया, ६) देशविकासाचे महत्त्वपूर्ण अंग, ७) शासकीय भूमिका. यानंतर तुम्ही ग्रामीण विकास उद्दष्टे अभ्यासली, १) रोजगारामधून आर्थिक उत्पन्न वाढविणे, २) ग्रामीण लोकांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा, ३) आरोग्याचा दर्जा सुधारणे, ४) तंत्रज्ञान, वाहतुक आणि दळणवळणाची साधने यांची निर्मिती करणे, ५) पर्यावरण संरक्षक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, ६) सामाजिक विषमता नष्ट करणे, ७) शास्त्रीय ज्ञानावर आधारित ग्रामीण जीवनाची उभारणी करणे, ८) विविध संस्था आणि संघटनांची स्थापना करणे. यानंतर ग्रामीण विकासाच्या विविध दृष्टिकोनाचा अभ्यास तुम्ही केलेला आहे ते पुढीलप्रमाणे १) बहुउद्देशीय दृष्टिकोन, २) किमान पॅकेज दृष्टिकोन, ३) लक्ष्य समूह दृष्टिकोन, ४) क्षेत्र विकास दृष्टिकोन, ५) एकात्मिक विकास दृष्टिकोन. याबरोबरच घटकाच्या शेवटी ग्रामीण विकासात येणारे अडथळे समजावून घेतले. यामध्ये आर्थिक, राजकीय आणि सामाजिक-सांस्कृतिक स्वरूपाचे अडथळे आढळले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**योग्य पर्याय निवडून खाली दिलेली विधाने पूर्ण करा.**

१) ग्रामीण विकास ही ................ चालणारी प्रक्रिया आहे.

अ) अल्पकालावधीसाठी ब) मर्यादित लोकांसाठी क) निरंतर ड) यापैकी नाही.

२) ग्रामीण विकासात ............... ची भूमिका महत्त्वाची असते.

अ) तज्ज्ञांची ब) दलालांची क) शासनाची ड) ठेकेदारांची

३) ज्या दृष्टिकोनात एकाच वेळी एकापेक्षा अधिक उद्दिष्टे साध्य करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते त्यास ............ दृष्टिकोन असे म्हणतात.

अ) क्षेत्र विकास ब) एकात्मिक विकास क) बहुउद्देशीय ड) लक्ष्य समूह

४) समुदाय विकास कार्यक्रमाची सुरुवात .................... साली झाली.

अ) १९६७ ब) १९६० क) १९५० ड) १९५२

५) भारतात एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची सुरुवात ............... साली झाली.

अ) १९४० ब) १९८० क) १९७८ ड) १९३०

## १.४ स्मरणार्थ संज्ञा

**ग्रामीण विकास** - ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांच्या कल्याणाच्या दृष्टिने त्यांच्या जिवना संबंधीच्या सर्व क्षेत्रामध्ये गरजेनुसार बदल घडवून आणणे.

**किमान** - कमीत कमी

**मधुमक्षिका** - मधमाशा

**वराह** - डुक्कर

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) क २) क ३) क ४) ड ५) क

## १.६ स्वाध्याय

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) ग्रामीण विकास म्हणजे काय ते स्पष्ट करा.

२) ग्रामीण विकास : व्याख्या आणि उद्दिष्टे स्पष्ट करा.

३) ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनांची माहिती विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

१) ग्रामीण विकास संकल्पना

२) ग्रामीण विकासाची उद्दिष्टे

३) ग्रामीण विकासातील अडथळे

४) ग्रामीण विकासाचा लक्ष्य समूह दृष्टिकोन

## १.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके


१) ग्रामीण समाजशास्त्र (१९९०), प्रा. ना. ए. चुनखडे, अहमदनगर प्रा. वि. भ. पाटील (कराड)

२) ग्रामीण समाजशास्त्र (२०१५), प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.

३) Management and Planning of Rural Development in India (1989)> Chamanlal Kashyap, Ashish Publishing House, New Delhi.


❑❑❑

# घटक – २

# नियोजन आणि व्यवस्थापन

## (Planning and Management)

**घटक संरचना :**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ ग्रामीण विकासासाठी नियोजन

२.२.२ ग्रामीण विकासासाठी धोरणे आणि रणनिती

२.२.३ ग्रामीण विकासासाठीची सुधारणा धोरणे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ स्वाध्याय

२.६ अधिक वाचनासाठीची पुस्तके.

### २.० उद्दिष्टे (Objectives) :

- ग्रामीण विकासाची योजना समजून घेता येईल.
- ग्रामीण विकासाची धोरणे आणि रणनिती समजून घेता येतील
- ग्रामीण विकासासाठी सुधारणात्मक धोरणे समजून घेता येतील.

### २.१ प्रास्ताविक :

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतात जवळपास ६ लाख खेडी आहेत. म्हणून भारतातील सर्वाधिक लोकसंख्या खेड्यात राहते. भारत देश स्वातंत्र्य होण्यापूर्वी महात्मा गांधी व अन्य समाजसुधारकांनी ग्रामिण

विकासाच्या योजना राबवल्या गेलेल्या आहेत. त्याच बरोबर काही धोरणे सुद्धा राबवली गेली आहेत. प्रस्तुत घटकात आपण त्याचा आढावा घेणार आहोतच. सरकारकडून अनेक ग्रामीण विकासासंदर्भात योजना उपक्रम राबवले आहेत. याद्वारे ग्रामीण समाजातल्या कमजोर किंवा दुर्बल घटकांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय स्तर उंचावेल. ग्रामीण विकासात राष्ट्रीय विकासाचा पर्याय मानला जाऊ शकेल. म्हणूनच भारत देश खेड्याचा देश म्हटले जाते. कारण ७० टक्के लोकसंख्या खेड्यात निवास करते.

## २.२ विषय विवेचन :

प्रस्तुत प्रकरणात ग्रामीण विकासाचे नियोजन ग्रामीण विकासासाठी धोरणे आणि रणनिती त्याच बरोबर ग्रामीण विकासासाठीची सुधारणा धोरणे याचा आढावा घेणार आहोत. ग्रामीण विकास समजून घेत असताना सदर घटकाचा विस्तृत परामर्श घ्यावा लागेल.

### २.२.१ ग्रामीण विकासासाठी नियोजन (Planning for Rural Development)

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनाची भुमिका महत्त्वपूर्ण आहे. एखाद्या घटकाचा विकास करावयाचा असल्यास कोणत्या गोष्टीचा विचार करावा लागतो हे महत्त्वाचे असते. आर्थिक, सामाजिक विकास करावयाचा असल्यास त्याचे योग्य पद्धतीने नियोजन करणे महत्त्वाचे आहे. नियोजन आणि विकास परस्पराशी संबंधित बाबी आहेत. नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा विचार सर्वप्रथम रशियात झाल्याचे दिसून येते. म्हणूनच रशियामध्ये इ.स. १९१७ च्या क्रांतीनंतर आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात बदल होऊन रशिया जगामध्ये एक महासत्ता बनू शकला. म्हणजेच येथे नियोजनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. सर्वसाधारणपणे व व्यापक दृष्टीने नियोजन म्हणजे अशी एक योजना किंवा रचना अथवा चौकट आहे की, ज्यामुळे कार्य करणे सोयीचे होते. नियोजन हे उद्दिष्ट प्राप्तीसाठी तयार करण्यात आलेली रूपरेषा किंवा कार्यक्रम होय.

**नियोजनाचे अर्थ :** (Meaning of Planning)

१) नियोजन म्हणजे विचाराची दिशा निश्चित सांगण्याचा प्रयत्न करणे किंवा एक निश्चित दिशा ठरवणे.

२) आपल्या जवळ असलेल्या मर्यादित साधन सामुग्रीचा योग्य काटेकोर उपयोग करणे.

३) आपल्या पुढील उद्दिष्टात किंवा कार्यात जे अडथळे व अडचणी आहेत किंवा ज्या समस्या किंवा प्रश्न आहेत ते सोडवण्याचा प्रयत्न करणे.

४) आपल्या उद्दिष्टात व कार्यात जे धोके आहेत त्यांना दूर करणे.

उद्दिष्ट किंवा हेतू साध्य करण्यात जो संघर्ष वा विरोध आहे तो नाहिसा करणे हे सर्व अर्थ नियोजनाच्या कल्पनेत अभिप्रेत आहेत म्हणूनच नियोजन एक व्यापक अर्थाचा व दृष्टीकोनाचा शब्द आहे. नियोजन एक संघटीत अशी प्रक्रिया आहे. नियोजन उद्दिष्ट साध्य करण्याचे तंत्र आहे. पंचवार्षिक योजना सुद्धा आपले उद्दिष्ट साध्य करण्याचे एक साधन होते. विकासात नियोजनाला महत्त्वाचे स्थान आहे. नियोजनाशिवाय देशाचा विकास साधता येणार नाही. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतीक विकास साधावयाचा असल्यास विकासाला

अतिशय महत्त्व आहे.

**भारतात नियोजनाची आवश्यकता** (Need for Planning)

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषी या शब्दाचा संबंध खेड्याशी ग्रामीण भागाशी येतो. खेड्याचा विकास केल्याखेरीज भारताचा विकास होणे अवघड आहे म्हणून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला अनन्य साधारण महत्त्व आहे. भारतासारख्या विकासशील देशामध्ये अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे इथे उत्पन्न आणि मालकी यांच्यावर २% लोकांचे प्रभुत्व आहे. त्याच बरोबर प्रचंड असमानतेत ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण आहे. त्यासाठी ग्रामीण विकासासाठी योजनेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्याचबरोबर क्षेत्रीय असमानता आणि क्षेत्रीय विकासा संदर्भातील समस्या आवासून उभ्या आहेत ज्यामध्ये भौगोलिक स्थिती, पर्यावरणीय घटक जसे की पूर, दुष्काळ व अवर्षण इत्यादी समस्या आहेत. या आव्हानाचा सामना करणेसाठी भारतामध्ये नियोजनाची गति जलद करणेची आवश्यकता आहे. ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू लोकविकास असला पाहिजे. गरिबी निर्मूलन झाले पाहिजे. कारण ही लोकसंख्या सर्वाधिक आहे. गरीब असुरक्षित असतात. भारतातील ग्रामीण दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या लोकांना सामाजिक सेवेचा लाभ अतिशय कमी प्रमाणात मिळतो. साक्षरतेचे कमी प्रमाण, बालमृत्युदर, आजारपण, कुपोषण, स्वच्छतेचा अभाव, स्वच्छ पाण्याची कमतरता, निवाऱ्याच्या समस्या या कमतरता दिसून येतात. वास्तविकपणे कोणत्याही विकास प्रक्रियेचा दृष्टीकोण समाजातील वंचित लोकांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे म्हणून नियोजन महत्त्वाची भूमिका पूर्ण करते.

**२.२.२ ग्रामीण विकासासाठी धोरणे आणि रणनिती** (Rural Development Policy & Strategy)

ग्रामीण विकासाचे महत्त्व अलिकडच्या काळात उदयास येत आहे. या संदर्भात ग्रामीण विकासाची संकल्पना ही खूपच महत्त्वाची आहे. भारत देशाचा विकास तेव्हाच होईल जेव्हा खेड्याचा विकास होईल. शेवटी ग्रामीण विकासाची रणनिती अत्यंत महत्त्वाची आहे. ही रणनिती अनेक प्रकारची असू शकते. सध्या खेड्याचा विकास करण्यास सुरू आहे. ग्रामीण विकासाची संकल्पना रणनितीवर आधारीत आहे. ग्रामीण विकासाची संकल्पना, ग्रामीण विकासाचे नियोजन, आणि कार्यक्रम, समुदाय विकास कार्यक्रम, एकीकृत ग्रामीण विकास, स्थानिक सहभाग, ग्रामीण विकास रणनिती यासारखे मुद्दे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर ग्रामीण विकास अनुषंगाने धोरणाचा आराखडा बनवला आहे. ग्रामीण विकासाचा कोणता एक मार्ग नाही. विविध विद्वानांनी त्यासाठी वेगवेगळे मार्ग सुचवले आहेत. वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक मुद्दे लक्षात घेऊन ग्रामीण विकास होणे अपेक्षित आहे. प्रत्येक ग्रामीण विकास नियोजनाचे निर्धारक घटक असतात. त्यांना लागू करणेसाठी व्यवस्थित मांडणी करणे गरजेचे असते. काही धोरणे ग्रामीण विकासाच्या रणनितीमध्ये समान असतात. त्यामध्ये शिक्षण, रोजगार, आरोग्य, जमिन, तंत्रज्ञान, शेती उत्पादनासंबंधी धोरण यांचा समावेश होतो. ग्रामीण भागात शेती ही एक महत्त्वाची आर्थिक गतिशीलता असते. भारतात प्रामुख्याने बहुतांशी लोकांच्याकडे जमिनीचे प्रमाण अत्यल्प आहे. ग्रामीण समाजाला बदलण्याचे एक साधन भुमी सुधारणा आहे. कित्येक वेळा असे निदर्शनास आले आहे की कमी क्षेत्र असलेल्या शेतकऱ्याचे उत्पन्न अधिक दिसून आले आहे. त्याचे कारण म्हणजे अधिक श्रम आहे. भुमी सुधारणेमुळे उत्पन्नात वाढ होते. अर्थात ग्रामीण विकासाच्या रणनीतीमध्ये भुमी एक महत्त्वाचा घटक ठरते. शेतीबरोबरच तंत्रज्ञान विकसीत होणे गरजेचे आहे.

तंत्रज्ञान गावागावात विस्तारीत झाले पाहिजे. त्याचं कारण म्हणजे भारतातील शेती पावसावर अवलंबून आहे. पावसाच्या अनिश्चिततेमुळे तंत्रज्ञानाचा विकास होणे आवश्यक बनते. कमी उत्पादन किंवा बेरोजगारी हे ग्रामीण समाजाची ओळख आहे. जर तंत्रज्ञान विकसीत झाले तर युवकाचे रोजगारासाठी शहराकडे पलायण होणार नाही. बेरोजगारीलासुद्धा लगाम बसेल. आजपर्यंत जेवढे ग्रामीण बेरोजगारी निर्मुलनाचे कार्यक्रम राबवले जात आहेत ते अपयशी ठरलेले आहेत. वास्तविकपणे या कार्यक्रमाद्वारे ग्रामीण भागातल्या उत्पन्नाच्या असुरक्षिततेला वाचवता आले असते. या कार्यक्रमाद्वारे पूर्ण वर्ष रोजगार उपलब्ध केला जाऊ शकतो. ज्याद्वारे लोकसंख्येचा जमीनीवरील दबाव किंवा अवलंब कमी होऊ शकेल. कारण ग्रामीण भागात शेती हेच रोजगाराचे साधन आहे. शेतीच्या विकासाने ग्रामीण क्षेत्रातील लोकांचे जीवनस्तर उंचावता येतील. निरक्षरता ही ग्रामीण लोकांच्या जीवनातील व्यापक बाब आहे. त्यामुळे शिक्षणाचा अभाव ग्रामीण विकासासाठी बाधक ठरू शकेल. ग्रामीण जीवनात उत्पन्नाचे साधन व संपत्तीमध्ये असमानता दिसून येते. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा उंचावल्यास ग्रामीण जीवनाच्या प्रगतीचा आलेख उंचावेल. शिक्षणाबरोबरच संशोधन ही तितकेच महत्त्वपूर्ण आहे. संशोधनामुळे ग्रामीण विकासाच्या मुळापर्यंत पोहचता येईल. ग्रामीण विकासासाठी प्रशिक्षित कर्मचारयाची सुद्धा गरज असते. ग्रामीण विकासासाठी ग्रामीण संस्थेत बदल होणे गरजेचे आहे. ग्रामीण विकासाच्या रणनिती व धोरणामध्ये बदल करावयाचा झाल्यास संस्थागत बदल होणे गरजेचे असते. ग्रामीण विकासामध्ये संस्थात विकास होणे गरजेचे आहे. ग्रामीण विकास धोरणे बदवताना संस्थात्मक चौकटीचा विकास करणे गरजेचे होते. ग्रामीण विकास रणनिती या ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण असतात. शेतीच्या उत्पादनाचे भाव हे ठरवले गेले पाहिजेत. ज्याच्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या उत्पन्नाचा योग्य मोबदला मिळेल. त्यामुळे उपयुक्त इतर वस्तुची खरेदी शक्ती वाढेल आणि ग्रामीण गरीबीचे निराकारण होण्यास मदत मिळेल. त्याचबरोबर आर्थिक अनुदान ग्रामीण विकासाच्या उद्देश प्राप्तीसाठी महत्त्वाचे साधन बनले आहे.

**ग्रामीण विकासाच्या रणनितीचे प्रकार :** (Types of Rural Development Strategy)

ग्रामीण विकास योजनेत ध्येय धोरणाची महत्त्वाची भूमिका आहे. या रणनितीद्वारेच ग्रामीण विकास कार्य संपन्न केला जातो. ग्रामीण विकासाच्या योजनेत रणनितीचे प्रकार पुढीलप्रमाणे–

**१) भुमीधोरण** : भु–धोरण अतिषय महत्त्वाचे आहे. याद्वारे ग्रामीण विकास केला जाऊ शकतो.

**२) तंत्रज्ञान धोरण :** तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण विकासाचा कायापालट होऊ शकतो. तंत्रज्ञानामुळे शेतीतील उत्पन्न वाढेल. कामाची कुशलता वाढीस लागेल. रोजगार उपलब्ध होईल.

**३) कृषिरणनिती :** या धोरणाची चर्चा आपण केलीच आहे. ग्रामीण समाजाचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेती हेच आहे.

**४) रोजगार धोरण :** ग्रामीण विकासात रोजगार धोरण महत्त्वाचे या अंतर्गत युवकांना रोजगार देणे गरजेचे आहे.

**५) शिक्षण, संशोधन आणि विस्तार धोरणे :** या अंतर्गत शिक्षण आणि संशोधनाचा विस्तार होणे गरजेचे आहे.

६) **ग्रामीण संस्था धोरणे :** या अंतर्गत संस्थेचा विकास अपेक्षित आहे. त्याचबरोबर संस्थांची निर्मिती.

७) **मुल्य धोरण :** ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण असून यामध्ये किंमत निर्धारण केले जाईल. याचा सविस्तर आढावा आपण पुढील मुद्यामध्ये घेतला आहेच इथे याची सविस्तर चर्चा करू.

**ग्रामीण विकासाची धोरणे** (Policy of Rural Development)

ग्रामीण विकासासाठी ग्रामीण समाजाला वगळून देशाची प्रगती होणार नाही हे लक्षात आल्यावर ग्रामीण लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासनाने ध्येय धोरणे ठरवली. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या या समाजाचा विकास करण्याचे निश्चित धोरण ठरवून त्यासाठी प्रथम प्रत्येक खेड्याचा विकास करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी आर्थिक सुधारणेचे केंद्र खेडे ठरवले. कल्याणकारी राज्याचे स्वप्त साकार करावयाचे झाल्यास ग्रामीण विकास व्हायला हवा. या हेतूने काही धोरणे शासनाकडून ठरवली गेली ती पुढीलप्रमाणे-

१) शेतीचा सर्वांगीन विकास

२) शिक्षणाचा प्रसार

३) दळणवळणाची वाढ

४) आरोग्यसंबंधी सुविधा वाढविणे

५) समाजकल्याण

६) घरबांधनी योजना

७) ग्रामीण उद्योग धंदे

८) रोजगार निर्मिती

**१) शेतीचा सर्वांगिन विकास :** ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. परंतु कोरडवाहू जमीन असल्याने निव्वळ निसर्गावर अवलंबून रहावे लागते. शेत जमीनीला बारमाही व हंगामी पाण मिळत नसल्याने उत्पन्न कमी निघते. शिवाय वाढत्या लोकसंख्येमुळे ज्याचेकडे जमीन आहे. तिचे सुद्धा लहान-लहान तुकड्यात विभाजन झाल्याने कुटुंबांचा उदरनिर्वाह होणे कठीण असते. पारंपारिक अवजारे वापरण्यावर भर असल्याने ही उत्पादन पाहिजे तसे निघत नाही. त्यामुळे शासनाने ग्रामीण विकास योजनेअंतर्गत आधुनिक शेती अवजारे रासायनिक खते, संकरित बी-बियाणे, रासायनिक औषधे इ. साठी कर्जाची व्यवस्था केली आहे. शेती पिकाला पाणी हवे म्हणून तलाव, धरणे, विहिरी खोदल्या आहेत. विहीरीसाठी कर्जपुरवठा केला जातो. सामुहिक विहिरीचा उपयोग शेतकऱ्यांच्या पिकासाठी करण्यावर लक्ष दिले जाते.

**२) दारिद्र्य निर्मुलन :** आर्थिक बाबतीत ग्रामीण समाज हा मागासलेला आहे. काही लोक आर्थिकदृष्ट्या सक्षम तर काही शेतकरी अवलंबित असतात. कष्टावर उदरनिर्वाह करत असतात. त्यासाठी शासनाने प्रत्येक

कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी योजना आखून त्यांचे दारिद्र्य कसे नष्ट करता येईल यासाठी अनेक उपाय योजना केल्याचे दिसून येते.

**३) आर्थिक स्वयंपूर्णता :** ग्रामीण दारिद्र्य कमी होण्यासाठी आज विविध कार्यक्रमाअंतर्गत स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाकडून वित्तपुरवठा केला जात आहे. हाताला काम मिळविणेसाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे देण्यात आली आहेत. त्याद्वारे लोकांना फायदा होत आहे. थोडक्यात सर्वच बाबीतून आर्थिक स्वयंपूर्ण करण्यात भर देण्यात येत आहे.

**४) शिक्षण प्रसार :** शिक्षणसुद्धा दारीद्र्यात भर घालते. काही प्रमाणात आज ग्रामीण दारीद्र्य दिसून येते. गरिबी व व्यावसायाला लागणारे अधिक मनुष्यबळ यामुळे ग्रामीण समाज शिक्षणाच्या बाबतीत उदासीन बनला आहे. ही उदासीनता कमी करणेसाठी किंवा कायमची घालविण्यासाठी शासकीय पातळीवरून ग्रामविकास योजनेअंतर्गत प्रत्येक गावात शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. त्या माध्यमातून दुर्बल घटकातील मुला-मुलींना वह्या पुस्तके इत्यादी शैक्षणिक साहित्य मोफत देण्यात येऊ लागले आहे. शिवाय प्रौढ-व्यक्ती साक्षर व्हाव्यात म्हणून अनेक योजना आखल्या जात आहेत. मुलाचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**५) आरोग्यासंबंधी सुविधा पुरविणे :** ग्रामीण समाजात आरोग्यविषयक सुखसोईचा अभाव असल्याने कित्येकांना मृत्यूला सामोरे जावे लागते म्हणून ग्रामीण भागात रुग्णालये सुरू करणेत आली आहेत. प्रत्येक गावासाठी परिचारीकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे स्त्रियांना बाळंतपणात त्रास सहन करावा लागणार नाही. त्याचबरोबर शुद्ध पाणी लोकांना मिळेल यावर लक्ष केंद्रीत केले गेले आहे. मलेरिया, देवी, गोवर, विषमज्वर वगैरे आजारांचे निर्मूलन करण्यासाठी शासन ग्रामीण लोकांसाठी युद्धपातळीवर प्रयत्न करू लागले. प्रत्येक खेड्यात यानुसार योजना आखून बांधण्यात येऊ लागल्या. लोकांचे आरोग्य चांगले असेल तरच ग्रामीण विकासाचे स्वप्न साकार होऊ शकेल यांची शासनाला पुरेपूर जाणीव झालेली आहे. यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

**६) ग्रामीण उद्योगधंदे :** इंग्रजांच्या आगमनाने व त्यांच्या एकंदरित आर्थिक व राजकीय ध्येय धोरणामुळे ग्रामीण उद्योगधंद्याचा अस्त झाला. परंतु संध्या विविध योजनेच्या अंतर्गत ग्रामीण उद्योग धंद्याला चालना देण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. ग्रामीण उद्योगाना चालना दिली जात आहे. त्याचबरोबर ग्रामीण उद्योगाना विकासाचे ध्येय गाठण्यावर भर दिला जात आहे.

**समुदाय भावना :** पाश्चिमात्त्य सांस्कृतीचा प्रभाव, शिक्षण प्रसार आणि नविन आर्थिक व्यवस्था इ. मुळे ग्रामीण जीवन विस्कळीत झाल्याने लोकांतील समुदाय भावना कमी झालेले होती. शहराकडे घेणारे स्थलांतर आफ जागतिकीकरणाचा प्रभाव वाढल्याने ग्रामीण माणूस आत्मकेंद्रीत बनलेला होता. खेड्याची स्वयंपूर्णता कमी होऊन परावलंबित्व वाढत चालले होते. एकमेकाबद्दल वाटणारा आदर व ग्रामीण भावना कमी झाल्याने येथील माणूस स्वार्थी बनलेला होता. म्हणून शासनाने ग्रामविकास धोरण ठरवून ग्रामीण समाजात समुदाय भावना वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. खेड्यातील लोक कोणत्याही कारणाने इतरत्र जाऊ नयेत म्हणून त्यांच्यासाठी

सर्व प्रकारच्या सुखसोई उपलब्ध करून परस्परांवर अवलंबून राहण्यासाठी व एकमेकाबद्दल आदर निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जाऊ लागले.

**दळणवळण :** देशाची प्रगती होण्यासाठी दळणवळण व्यवस्था खूप महत्त्वाची असते. दळणवळणाच्या व्यवस्थेने शहरे, खेडी, राज्ये एकत्र येऊन रोजगाराच्या व्यापाराच्या सुविधांची निर्मिती होऊन प्रगती होऊ शकते या अनुषंगाने शासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. पक्क्या रस्त्यांची निर्मिती देशाला समृद्धीकडे घेऊन जाते. सध्या रस्त्याच्या सुविधांमुळे दळणवळणाची साधने महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

### **२.२.३ ग्रामीण विकासासाठीची सुधारणा धोरणे** (Implementation Policies of Rural Development)

ग्रामीण विकासाच्या उन्नतीसाठी सरकारने अनेक धोरणे व कार्यक्रम राबवले आहेत. ज्या कार्यक्रमाच्याद्वारे विकासाच्या अनुषंगाने महत्त्वाच्या धोरणाचा समावेश करावा लागेल. त्यामध्ये १) जमीन भूमी धोरण, २) तंत्रज्ञान धोरण, ३) रोजगार धोरण, ४) शिक्षण धोरण व संशोधन विस्तार, ५) किंमत निर्धारण

**१) भुमी धोरण :** भुमी ग्रामीण विकासासाठी अतिशय महत्त्वाचा घटक असून सरकारने अनेक महत्त्वाच्या योजना राबवल्या आहेत. त्यामध्ये पंचवार्षिक योजना याचेही मोठे योगदान दिसून येते. हरीतक्रांती ज्यामुळे खाद्यान्न उत्पन्न वाढले. हरीत क्रांतीचेही सकारात्म व नकारात्म परिणाम झालेले दिसून येतात. ज्यामध्ये अल्पभुधारकास जादा नफा मिळू शकला नाही. या योजने अंतर्गत बी-बीयाणे, खते, किटक नाशके, डिजेल यावरही अनुदान दिले गेले आहे. भारताच्या मध्य आणि पूर्व भागात यामुळे उत्पन्न वाढीस लागले.

**२) तंत्रज्ञान धोरण :** या अंतर्गत शेती उत्तर वाढीबरोबरच शेती आधारीत अनेक छोटे मोठे उद्योगधंदे वाढीस लागल्याचे दिसून येते. ग्रामीण समाजाच्या विकासात योग्य तंत्रज्ञान निवडावे लागेल. जेणेकरून होणारे मजूर व रोजगाराचे स्थरांतर कमी होईल व ग्रामीण भागातच उच्च उत्पादन क्षमता आणि रोजगाराच्या संधी यांचा समतोल निर्माण होईल. ग्रामीण विकासाचे कार्यक्रम राबवताना पायाभुत धोरण दूर्लक्षित करून ग्रामीण विकास घडून येणे अशक्य आहे.

**३) रोजगार धोरण :** ग्रामीण रोजगार निर्मुलनासाठी सुद्धा काही योजना कृतीशीलता आहेत. त्यामध्ये MANERGOA, IRDP, IRDP (Integrated Rural Development Programme) म्हणजे अ) दुर्बल घटकाना प्राधान्य, ब) दारीद्र्य निर्मुलन, क) विविध कामासाठी अनुदान, ड) अनुसुचित जाती जमातीना प्राधान्य, सदर धोरणातून, दुग्ध व्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यउद्योग, लघुउद्योग, विणकाम, शिवणकाम, सुतारकाम याना अनुदान देऊन अर्थसहाय्य करण्याचे धोरण यशस्वी झाल्याचे दिसून येते. यामध्ये TRYSEM, IADP, DPAP जवाहर योजना यांचाही उल्लेख करावा लागेल.

**४) शिक्षण विस्तार आणि संशोधन धोरण :** भारतातील निरक्षरता दूर करावयाची असेल तर शिक्षण आणि संशोधन याचे खूप महत्त्वाचे काम आहे. त्यासाठी शासनामार्फत विविध शैक्षणिक प्रकल्पाना मान्यता देण्यात आली आहे. संशोधन विविध विषयाच्या अंगाने होताना दिसून येत आहे. आज संशोधन ग्रामीण विकासाचा आधारभूत घटक आहे. त्यामुळे ग्रामीण विकास जलद गतीने घडून येईल. ज्यामुळे ग्रामीण

भागातील संस्कृतीस योग्य असे संशोधन पुढील संशोधनातून सक्षम करील.

**५) किंमत धोरण :** ग्रामीण विकास किंमत धोरण हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरते. त्यासाठी शेतमालाला योग्य किंमत मिळण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचबरोबर शेतीतील उत्पन्न दुप्पट वाढीसाठी विविध योजनेच्या माध्यमातून अनुदान देण्याचे उपक्रम सुरू आहेत. खते, किटकनाशके आणि बियाण्याच्या बाबतीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येत आहेत. अशाप्रकारे सद्यस्थितीत किंमत धोरण ग्रामीण विकासासाठी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपयुक्त साधन म्हणून काम करत आहे. नव-उदारमतवादी धर्तीवरील अलिकडील विचारामुळे किंमत धोरणातील विविध पैलूंमध्ये महत्त्वपूर्ण बदल धरला आहे. आणि हे अगदी स्पष्ट आहे की उदारीकरणाच्या काळात ग्रामीण भारताला प्रचंड ताणतणावाचा सामना करावा लागत आहे.

**★ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

१) भारतात जवळपास किती खेडी आहेत.

२) ग्रामीण विकासाच्या योजना राबवलेल्या सुधारक कोण.

३) नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा विचार सर्वप्रथम कोणत्या देशात झाला.

४) नियोजनाचा एकादा अर्थ सांगा.

५) ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू कोणता असावा.

६) ग्रामीण विकासातील विविध समस्या कोणत्या.

७) युवकाचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर कोणत्या घटकामुळे थांबेल.

८) कोणत्या कारणामुळे कल्याणकारी राज्याचे स्वप्न साकार होईल.

९) कोणत्या कारणामुळे समुदाय भावना कमी झाली आहे.

१०) कोणत्या व्यवस्थेने शहरे, खेडी, राज्ये एकत्र येवून रोजगाराच्या व्यापाराच्या सुविधाची निर्मिती होते.

११) IRDP चे पूर्ण रूप कोणते.

## २.३ सारांश

सदर घटकात आपण विविध मुद्द्यांच्या आधारे ग्रामीण विकासाचे पैलू समजावून घेतले आहेत. यामध्ये ग्रामीण विकासाचे अर्थ उद्दिष्ट्ये थोडक्यात समजून घेतली आहेत. त्यानंतर ग्रामीण विकासासाठीच्या नियोजनावर विस्तृत चर्चा केलेली आहे. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने मुलभूत बाबीवर प्रकाश टाकला आहे व ग्रामीण विकासाचे स्वरूप समजून घेतले आहे. यामध्ये ग्रामीण विकासासाठीच्या धोरणाचा व रणनितीचा ग्रामीण जीवनावरील दूरगामी परिणाम काही प्रमाणात ऐतिहासिक मुद्दे, पंचवार्षिक योजना यांचा आढावा घेतला आहे. नियोजन का महत्त्वाचे आहे या बाबीचा सुद्धा उल्लेख केला आहे. ग्रामीण विकासाच्या रणनितीच्या प्रकारावर

प्रकाश टाकलेला दिसून येतो. तसेच ग्रामीण विकासासाठीची महत्त्वाची धोरणे यांचा विविध मुद्द्यांच्या आधारे समजून घेण्याचा प्रयत्न केल्याचा दिसून येतो.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१) जवळपास ६ लाख

२) महात्मा गांधी

३) रशिया

४) आपल्या जवळ असलेल्या मर्यादित साधनसामुग्रीचा योग्य काटेकोर उपयोग करणे.

५) लोकविकास

६) दारिद्र्य, कुपोषण, साक्षरतेचे प्रमाण कमी, आजारपण, स्वच्छ पाण्याची कमतरता इ.

७) तंत्रज्ञानामुळे

८) ग्रामीण विकासामुळे

९) पाश्चिमात्त्य सांस्कृतीचा प्रभाव, शिक्षण प्रसार आणि नविन आर्थिक व्यवस्था इ. मुळे.

१०) दळणवळण

११) Integrated Rural Development Programme

## २.५ सरावासाठी प्रश्न/स्वाध्याय

१) ग्रामीण विकासासाठीच्या नियोजनावर दीर्घ चर्चा करा.

२) ग्रामीण विकासासाठी धोरणे आणि रणनिती स्पष्ट करा.

३) ग्रामीण विकासासाठीची सुधारणा धोरणे यावर निबंध लिहा.

## २.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


1) Maheswari Sriram, 1985 Rural Development in India : A Public Policy Approach, Sage, New Delhi.

2) Reddy A. V. and Bhaskar G. Rural Transformation in India : The impact of Globalization, New Century, New Delhi.

3) Singh Katar 1986 Rural Development : Principle, Policies and Management, Sage, New Delhi.


❑❑❑

## घटक – ३

# भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम

## (Rural Development Programmes in India)

**घटक संरचना :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ स्वातंत्र्यपूर्व भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम

३.२.२ स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम

३.२.३ कृषी विकास कार्यक्रम

३.२.४ रोजगार हमी योजना कार्यक्रम

३.२.५ शैक्षणिक विकास कार्यक्रम

३.२.६ आरोग्य विकास कार्यक्रम

३.३.७ ग्रामीण विकासातील महात्मा गांधी, पंडीत नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठीची पुस्तके.

## ३.० उद्दिष्टे (Objectives) :

या अध्ययन घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास-

- स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रमांचा अभ्यास करता येईल.
- कृषी, शैक्षणिक, आरोग्य, रोजगार हमी या संदर्भातील विविध कार्यक्रम समजावून घेता येतील.
- ग्रामीण विकासातील महात्मा गांधी, पंडीत नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अभ्यासता येईल.

## ३.१ प्रास्ताविक (Introduction)

या घटकामध्ये आपण 'ग्रामीण विकासाची' संकल्पना समजावून घेणार आहोत. भारताची बहुसंख्य लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्य करत असल्यामुळे त्यांचा विकास होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. भारतातील ग्रामीण विकास अभ्यासत असताना शासनाने ग्रामीण विकासासाठी कोणकोणते कार्यक्रम, उपक्रम आखले आहेत. त्याची अंमलबजावणी कशा पद्धतीने होत आहे. ग्रामीण भारताच्या सर्वांगिण विकासावर आधारित हे कार्यक्रम आहेत का? ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी मुळातून काही प्रयत्न होत आहेत का? यासंदर्भाने या घटकात चर्चा होणार आहे आणि आपण ग्रामीण विकास कार्यक्रम, ग्रामीण विकासातील विविध महनीय व्यक्तींचे योगदान यासंदर्भात अध्ययन करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या घटकामध्ये तुम्ही भारतातील स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर ग्रामीण विकास कशा पद्धतीने झाला आहे, स्वातंत्र्यापूर्वी ग्रामीण विकासाची संकल्पना कशा पद्धतीने राबवली आहे, त्यांची उद्दिष्ट्ये काय होती, यासंदर्भातील माहिती पहिल्या व दुसऱ्या भागात अभ्यासणार आहोत. तर तिसऱ्या भागामध्ये कृषी विकास कार्यक्रम, रोजगार हमी योजना, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक विकास कार्यक्रम यासंदर्भातील विवेचन केलेले आहे. तर त्यानंतरच्या भागामध्ये ग्रामीण विकासातील महात्मा गांधी, पंडीत नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदानाबद्दल विवेचन करण्यात आलेले आहे.

### ३.२.१ स्वातंत्र्यपूर्व भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम (Rural Development Programme in Pre-independent India)

'ग्रामीण विकास' ही संज्ञा म्हणजे 'विकास' या व्यापक संज्ञेचा उपसंच आहे. संपूर्ण जगामध्ये व्यक्ती, कुटुंबे, समुदाय आणि राष्ट्रांनी मनात बाळगलेले वैश्विक पातळीवरील ध्येय हे विकासाचे आहे. 'विकास' ही एक वस्तुनिष्ठ आणि मूल्यावर आधारित संकल्पना आहे. त्यामुळे तिच्या अर्थाबाबत एकमत असू शकत नाही. वेगवेगळ्या पद्धतीने ही संज्ञा मांडली जाते. भारत हा देश खेड्यांचा देश आहे त्यामुळे खेड्यांचा विकास हाच भारताचा विकास आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळामधील शेतीविषयक धोरणांमध्ये आणि चळवळीमध्ये भूमी सुधारणाची दखल घेतलेली

आढळते. ब्रिटीशांनी आपल्या धोरणाचा भर जमीन महसूल गोळा करण्यावर ठेवला आणि जमीनमालकीच्या तत्कालीन पद्धतीला धक्का लावणे शक्यतो टाळलेले लक्षात येते. साधारण १९२१ ला झालेले मोपल्यांचे बंड, पंजाबमधील शेतकऱ्यांचा उठाव १९३० हे ग्रामीण क्षेत्रातील असंतोषाची तीव्रता दाखविणारा होता. या स्थितीमध्ये ब्रिटीशांना काही पावले उचलण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. त्यांनी 'कृषि विषयक सुधारणांचा विचार करण्यासाठी १९२८ मध्ये रॉयल कमिशन तर नियुक्त केले, परंतु शेती सुधारणाशी संबंधित महत्त्वाचे विषय, म्हणजे जमिनधारणा पद्धत, जमीन महसुलाचे निर्धारण किंवा सिंचन प्रकार या कमिशनच्या कक्षेत समाविष्ट नव्हते. सामाजिक दृष्टीने संवेदनशील अशा जमीन मालकीच्या विषयाला धक्का न लावणे हाच या मागील उद्देश होता. परिणामी शेतीमधील परोपजीवी वर्गाला म्हणजेच जमीनदार किंवा जहागिरदार यांना शोषणाचे अधिकार किंवा रान मोकळे करून देण्याच्या पद्धती तशाच राहिल्या.

ग्रामीण विकास म्हणजेच देशाचा विकास यावर विश्वास असणाऱ्या आणि त्यासाठी अत्यंत समर्पणाच्या भावनेने झटणाऱ्या अनेक व्यक्ती या भारतात होवून गेल्या. त्यांनी विविध ग्रामविकासाचे प्रकल्प राबविलेले दिसून येतात.

**श्रीनिकेतन प्रकल्प** : १९२१ मध्ये गुरूदेव टागोरांनी शांतीनिकेतनमधून ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमाचा प्रारंभ केला. शेती व पशुधनाचा विकास करणे, सहकारातून विकास करणे तसेच ग्रामस्वच्छता इत्यादी अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींवर भर देण्यात आलेला होता. गुरूदेवांनी आश्रमामध्ये असणाऱ्या तरुणांना ग्रामीण पुनर्निमानाच्या कार्यात सहभागी करून घेतलेले होते. त्यामुळे तरूण पिढीला विधायक दृष्टीकोन देण्याचे काम या प्रकल्पाने केलेले आहे. ही एक महत्त्वाची आणि उपयुक्त अशी सुरुवात होती.

**मार्तंडम प्रकल्प** (१९२१) : दक्षिण त्रावणकोरमधील मार्तंडम येथे या प्रकल्पाची सुरुवात झाली. श्री. स्पेन्सर हॅच यांनी या प्रकल्पाला सुरुवात केली. या प्रकल्पाच्या माध्यमातून एका रचनात्मक कार्यक्रमाला सुरुवात झाली. याच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रातील गरीब वर्गाची अवस्था सुधारण्याचा प्रयत्न या प्रकल्पाने केला. विशेषतः चटया, टोपल्या विणने, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन यासारख्या उद्योगांना मोठ्या प्रमाणावर चालना देण्यात आली.

**गुरगाव प्रकल्प** (१९२७) : पंजाबमधील गुरगाव येथे १९२७ साली श्री. ब्रायन यांनी सुरू केलेल्या या प्रकल्पात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानण्यात आली होती. या प्रकल्पाच्या अंतर्गत 'स्कूल ऑफ रूरल इकॉनॉमीची स्थापना करण्यात आली. याद्वारे ग्राम मार्गदर्शकांना प्रशिक्षित करण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. तसेच खास स्त्रियांच्या प्रशिक्षणासाठी 'डोमेस्टिक स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' ही संस्था स्थापन करण्यात आली. तसेच कृषिविषकास आणि ग्रामस्वच्छतेवर भर देण्यात आला. या गुरगाव प्रकल्पाचेही कार्य अत्यंत भरीव अशा स्वरूपाचे होते.

**बडोदा प्रकल्प** (१८९०) : बडोद्याचे महाराज सयाजीराव यांनी सुरू केलेल्या या बडोदा प्रकल्पामध्ये शिक्षण व शेती या दोन क्षेत्रांवर भर देण्यात आला. ग्रामपंचायतींना चालना देणे, बालशिक्षण, प्रौढशिक्षणाचा प्रसार या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. तसेच शेती विकासासाठी सिंचन आणि उत्तम बियाण्यांचे उत्पादन व वापर

याकडेही लक्ष दिले जात होते.

**फिरका (खेडे) प्रकल्प** (१९४६) : १९४६ मध्ये मद्रास प्रांतातील एकूण ३४ खेड्यांमध्ये विकासाची ही योजना लागू करण्यात आली. त्यानंतर ती इतर खेड्यांमध्येही लागू करण्यात आली. या प्रकल्पाने गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेला आदर्श मानून खेड्यांमध्ये निवास, रस्ते, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता यामध्ये सुधारणा घडविण्याचा कार्यक्रम आखण्यात आला होता. शेती, ग्रामोद्योगांचा विकास, पंचायतींची स्थापना, सहकारी संस्थाना चालना, सहकाराचे तत्त्व, सांस्कृतिक व सामाजिक बाबींना प्रेरणा अशी वैशिष्ट्ये या प्रकल्पाची होती. हा फिरका प्रकल्प नंतर १९५२ मध्ये सामुदायिक विकास कार्यक्रमात समायोजित करण्यात आला.

**इटवा पथदर्शक प्रकल्प** (१९४८) : उत्तर प्रदेशातील इटवा जिल्ह्यात १९४८ साली श्री. अल्बर्ट मायर या अमेरिकन नगररचनाकाराने या प्रकल्पाची सुरुवात केली होती. या प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे व विकासाच्या कार्यक्रमामध्ये त्यांना सहभागी करून घेणे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

**निलोखेरी प्रकल्प** (१९४८) : हरियानाच्या कर्नाल जिल्ह्यातील निलोखेरी येथे पुनर्वसन प्रकल्प हाती घेतला. हा प्रकल्प श्री. एस. के. डे यांनी सुरुवात केला होता. भारताच्या फाळणीनंतर देशात आलेल्या निर्वासितांचे पुनर्वसन ही गंभीर समस्या होती. ती सोडविण्यासाठी या निर्वासितांना जगण्याचा, कामाचा व मोबदल्याचा हक्क देणाऱ्या या प्रकल्पाने त्यांना विधायक कामात गुंतवले. यामध्ये वैद्यकीय सोयीचा विकास, स्वच्छता, शालेय शिक्षण, विविधा, व्यावसायिक शिक्षण, कुटीरोद्योग, कृषिउद्योग, कुक्कुटपालन हे ग्रामीण विकासाला पुरक अशा स्वरूपाचे होते. एकूणच या स्वातंत्र्यपूर्ण ग्रामीण विकासाच्या योजनेचे लक्ष्य हे सामूहिक प्रयत्न व सहभागातून ग्रामीण पुनर्रचना करणे आणि आर्थिक उन्नतीबरोबरच सामाजिक परिवर्तन घडवून आणणे हे होते.

या प्रकारे स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रमाची मांडणी करण्यात आलेली आहे.

### ३.२.२ स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम : (Rural Development Programme in Post-independent India)

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अनेक वेगवान बदल होत असले तरी शेतीला अद्यापही अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. एकूण जमिनीपैकी ५५ टक्के जमीन ही शेतीसाठी उपयोगात आणली जाते. शेतीचा विकास हा ग्रामीण विकास कार्यक्रमातील महत्त्वाचा विकास कार्यक्रम आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण जीवनमान उंचावण्यासाठी विविध प्रकारचे विकास कार्यक्रम आखण्यात आलेले होते. भारताच्या अर्थव्यवस्थेचे ठळक गुणवैशिष्ट्य हे ग्रामीण आहे. २०११ मध्ये, आपली जवळपास ६९% लोकसंख्या ही ६४० हजार खेडेगावात राहात होती आणि ६३% ग्रामीण लोकसंख्या ही कृषी आणि संबंधित व्यवसायात गुंतलेली होती. शेतकरी आणि शेतमजूर ही वस्तुस्थिती पुरावा आहे. भारतासारख्या प्रामुख्याने कृषिप्रधान देशात ग्रामीण विकास हा एकूण विकासाचा अपरिहार्य घटक आहे. आणि ग्रामीण विकासासाठी कृषि विकास हा पूर्वापेक्षित आहे.

त्यामुळे अशा देशामध्ये कृषी विकास हा राष्ट्रीय विकासाचा पाया असला पाहिजे.

ग्रामीण लोक ज्या परिस्थितीत काम करतात आणि राहातात त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी ग्रामीण विकासाची धोरणे तयार केली आहेत. भारताच्या संविधानात समाविष्ट केलेल्या ''राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार'', आर्थिक धोरणाची दोन प्रमुख उद्दिष्ट्ये प्राप्त करणे शक्य आहे. प्रथम म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे आणि दुसरे म्हणजे समाजाच्या सदस्यांमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण सुधारणे ही उद्दिष्ट्ये भारताच्या आर्थिक धोरणामध्ये प्रतिबिंबित झाली असून ती पंचवार्षिक योजनांमध्ये स्पष्ट केलेली आहेत.

भारतात नैसर्गिक साधनसंपत्तीची देणगी आणि मुलभूत सुविधांच्या बाबतीत भारतातील मागास भाग खुपच गरीब असल्यामुळे त्या भागात अनेक क्षेत्र-विशिष्ट, नैसर्गिक साधनसंपत्ती आधारित आणि पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांच्या स्वरूपात अनेक सुधारणात्मक उपाययोजना करण्यात आल्या.

भारतात वेळोवेळी सुरू केलेल्या काही पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमाची मुलभूत वैशिष्ट्ये म्हणजे लोकांचे उत्पन्न स्थिर करणे, समाजातील दुर्बल घटकांचे सबलीकरण, दुष्काळाच्या प्रभावाची तीव्रता कमी करणे, परिस्थितीक संतुलन टिकवून ठेवणे. या उद्दिष्टांच्या आधारावर काही ग्रामीण विकास कार्यक्रम ठरविण्यात आले. त्यामध्ये पुढील काही कार्यक्रम आखण्यात आले. १) इटवा पायलट प्रकल्प, निलोखेरी प्रकल्प, सामुदायिक विकास कार्यक्रम, जलसंसाधनांचा विकास आणि व्यवस्थापन, भूदान, ग्रामदान, सामुदायिक विकास कार्यक्रम, २) माती आणि आर्द्रता टिकवून ठेवणे. ३) वनीकरण, ४) पिकांच्या रचनेची पूनर्रचना, कुरणांचा विकास, ५) पिक पद्धतीत बदल, ६) पशुधन आणि दुग्धालय विकास, ७) लहान आणि सीमांत शेतकरी आणि शेतमजुरांचा विकास, ८) वाळवंट विकास कार्यक्रम, एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय वनीकरण, कोरडवाहू क्षेत्रांसाठी राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, राष्ट्रीय पीक विमा कार्यक्रम, इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, ग्रामीण आवास निर्माणासाठी कर्ज व अनुदान योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना, जलस्वराज्य प्रकल्प, यशवंत ग्रामसमृद्धी योजना, स्वजलधारा योजना, निर्मलग्राम, इंदिरा गांधी निराधार व भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान, आम आदमी विमा योजना, राष्ट्रीय बायोगॅस कार्यक्रम, जवाहर विहिर कार्यक्रम, दलित वस्ती सुधार योजना, तोडा वस्ती सुधारण योजना अशा असंख्य योजना आणि कार्यक्रम ग्रामीण विकासासाठी राबविण्यात आले आहेत. या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न शासन पातळीवर होताना दिसतो आहे.

### ३.२.३ कृषी विकास कार्यक्रम :

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अमुलाग्र पद्धतीने बदल होत आहे. भारताच्या सर्वच लोकांना अन्नधान्य आणि उद्योगांना कच्चा माल पुरविण्याचे काम शेती क्षेत्राकडूनच होते. आर्थिक नियोजनाच्या सुरवातीच्या कालावधीत शेतीच्या लागवडीचे स्वरूप परंपरागत असल्याने आपण आपली गरज पूर्ण करण्यास असमर्थ होतो. त्यामुळे विदेशातून आयात करणे अनिवार्य ठरत असे. हरित क्रांतीनंतर मात्र हे चित्र बदलले. प्रथमतः जिल्हा सधन शेती कार्यक्रम हा (१९६०-६१) मध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आला.

**जिल्हा सधन शेती कार्यक्रम :** हा कार्यक्रम म्हणजे हरित क्रांतीच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल होय. हा कार्यक्रम सात जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर लागू करण्यात आला. नंतर जवळपास ११४ जिल्ह्यात तो राबविण्यात आला. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. त्यावेळी उत्तम बियाणे, खते, विस्तार शिक्षण याची कमतरता होती म्हणून काही निवडक जिल्ह्यांमध्ये प्रयोग सुरू करण्यात आला. केंद्र व राज्य सरकारने या प्रयोगाला मदत केली आणि परिणाम म्हणजे प्रायोगिक क्षेत्रातील शेतीची उत्पादकता बरीच वाढलेली आढळली.

**हरित क्रांती :** स्वातंत्र्यानंतर भारतात शेतीची उत्पादकता वाढविण्याचे निरनिराळे प्रयत्न करण्यात आले. हरित क्रांतीने शेतीच्या उत्पादन पद्धतीचा चेहरा पूर्णपणे बदलला. संकरित वाणांच्या लागवडीत पाणीपुरवठा आवश्यक असल्याने लघू व सिंचन योजनांवर भर देण्यात आले. जंतूनाशके व कीटक नाशकांचा वापर वाढला, थोडक्यात हरित क्रांतीमुळे परंपरागत शेतीपद्धती तर बदललीच पण उद्योगांचीही भरभराट सुरू झाली. हरित क्रांतीमुळे उत्पादकता वाढून देश अन्नधान्यांच्या उत्पादनात स्वावलंबी झाला. आणि दुसरीकडे शेतीच्या खर्चात झालेली वाढही निदर्शनास येते.

**एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम** (IWDP)

भारतात पडीक जमीनीचे मोठे पट्टे आहेत. अशा जमीनीवर वाजवी खर्चामध्ये वनस्पतींचे अच्छादन करता येते. भारतातील पडीक जमिनीचा साधारण अंदाजे ७५ मेट्रीक हेक्टर ते २०० मेट्रिक हेक्टर आहे. (बलुनी आणि सिंग २००३) सध्या या पडीक जमीन विकास प्रकल्प सुरू आहेत. १९८९-९० पासून पर्यावरण आणि वनमंत्रालयाच्या आणि राष्ट्रीय विकास मंडळाच्या आश्रयाने या कार्यक्रमाला सुरुवात झाली. यामध्ये गावातील सुक्ष्म-पाणलोट योजनांवर आधारित पडिक जमिनीचा विकास करण्याचे उद्दिष्ट आहे. एकूण आर्थिक विकासाला प्रोत्साहन देणे, वंचित गटातील लोकांची सामाजिक आर्थिक स्थिती सुधारणे, रोजगार निर्मिती, दारिद्र्यनिर्मूलन, समुदाय सक्षमीकरण, आर्थिक साधनसंपत्तीचा विकास करणे.

याशिवाय कोरडवाहू क्षेत्रांसाठी राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषी उत्पादन आणि उत्पादकतेमध्ये शाश्वत पद्धतीने सुधारणा करणे, शाश्वत रोजगाराच्या संधीची निर्मिती करणे असे अनेक उद्दिष्ट्ये या कार्यक्रमामागे आहेत.

**फळबाग लागवड कार्यक्रम :**

२१ जून १९९० पासून महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवडीचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. या योजनेत शेतकऱ्याला १००% अनुदान ३ वर्षात दिले जाते. यासाठी कोरडवाहू क्षेत्रात ७५% व बागायती क्षेत्रात ९०% झाडे जगवणे अनिवार्य असते.

या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे कोरडवाहू शेतीचे उत्पादन वाढविणे व पडीक जमीन लागवडीखाली आणून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, पर्यावरण संतुलन राखणे. या योजनेअंतर्गत फळझाडे किंवा औषधी वनस्पतींची लागवड करावी लागते.

**विहिरींचे पुनर्भरण कार्यक्रम :**

पावसाच्या अनिश्चिततेमुळे पाण्याची स्थिती गंभीर झाली आहे. त्यासाठी पडणाऱ्या पावसाचा थेंब न थेंब आडवणे आणि मुरवणे. विहिरींच्या पुनर्भरणाच्याद्वारे शेतकऱ्यांच्या सिंचनाची हमी उद्देश आहे.

**जवाहर विहिर कार्यक्रम :**

महाराष्ट्रात १९९० पासून रोजगार हमी योजनेतून विहिर खोदण्याचा कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे विहिरींच्या आधारे सिंचनाचे क्षेत्र वाढविणे, कोरडवाहू व अल्पभूधारक शेतकऱ्याला विहिरी खोदून देणे, या कार्यक्रमाअंतर्गत महिलांना प्राधान्य देण्यात आले. या योजनेमार्फत ४२००० रु. ते ६१५०० रु. नवीन तरतुदीनुसार १,००,००० रु. अनुदान लाभार्थींना मिळते.

**कृषी औजारे वाटप :**

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर औजारे दिली जातात. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यास आधुनिक औजारे वापरण्यास प्रोत्साहन देणे, पिक संरक्षण, पिकांचे उत्पादन वाढविणे.

**कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन योजना :**

कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देऊन शेतीतील उत्पादन वाढविणे. अशा उद्देशाने बनवलेली ही योजना आहे. ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत आहे. यामध्ये शेतकऱ्यांना कृषीव्हेटर, ट्रॅक्टर, पॉवर टिलर, मळणीयंत्र, कृषी औजारे, इलेक्ट्रीक मोटार इ. यंत्रांच्या खरेदीवर अनुदान मिळते.

**कडधान्य : गळीत धान्य विकास कार्यक्रम :**

या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवीन औजारे व किटकनाशक वापरण्यास प्रोत्साहन देण्यात येते. ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत असून जिप्सम, पी. एस. बी. पाकीटे, एच.डी.पी.इ. पाईप, पीक संरक्षण, इत्यादीवर ५०% अनुदान दिले जाते.

**शेतमाल तारण कर्ज योजना :**

कृषी पणन मंडळाने ही योजना १९९० पासून यशस्वीपणे राबविली आहे. बऱ्याचवेळा शेतमालाची हंगामात एकदम आवक वाढून भाव कोसळतात. अशा परिस्थितीत बिगर नाशवंत शेतीमाल तारण ठेवल्यास शेतकऱ्याची आर्थिक नड भागते. ज्यावेळी शेतीमालाचे भाव कमी होतात अशा वेळी शेतकरी आपला माल बाजार समितीकडे तारण ठेवू शकतात. त्या मालावर ६% व्याजाने १८० दिवसाच्या मुदतीसाठी त्या दिवशीच्या बाजारभावाप्रमाणे ७५% रक्कम कर्ज म्हणून शेतकऱ्याना ताबडतोब दिली जाते. कर्ज रक्कम पणन मंडळामार्फत दिली जाते.

**शीतग्रह अनुदान योजना :**

ही योजना महाराष्ट्र शासनाने सुरू केली आहे. यामध्ये फळे, भाजीपाला यांची पुरेशी साठवणूक सुविधा नसल्यामुळे शेतीमालाच्या नासाडीचे प्रमाण वाढते. तसेच शेतमालाला चांगला भाव मिळत नाही. त्यांचे

नुकसान होते ते नुकसान टाळण्यासाठी शीतगृहासाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के व जास्तीत जास्त २.५ लाख रु. अनुदान देण्यात येते.

**कांदा साठवणूक चाळ योजना :**

कांद्याच्या शास्त्रोक्त चाळी उभारण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य कृषी पणन मंडळ व कृषी विभाग यांनी ही योजना सुरू केली आहे. कांदा जास्त काळ टिकवणे व शेतकऱ्यांना किफायतशीर भाव मिळवून देणे हा उद्देश या योजनेचा आहे.

अशा प्रकारच्या विविध योजना कृषी विकासातंर्गत अंमलात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

**३.२.४ रोजगार हमी योजना कार्यक्रम :**

महाराष्ट्रामध्ये १९७२ साली प्रचंड दुष्काळ पडला. त्यावेळी लोकांना रोजगार देवून जगविण्याचे काम या योजनेने केले आहे. १९६५ ते १९७४ या काळामध्ये ही योजना महाराष्ट्रात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आली. या योजनेला मिळालेले यश पाहून महाराष्ट्र विधीमंडळाने या योजनेस २० डिसेंबर १९७४ रोजी मंजुरी दिली. आणि २६ जानेवारी १९७८ रोजी महाराष्ट्र शासनाने 'रोजगार हमी कायदा' संमत केला. महाराष्ट्र राज्याने याद्वारे ३६५ दिवसाच्या कामाची हमी दिली आहे. महाराष्ट्र राज्य हे संविधानाच्या ४१ च्या करमाला अनुसरून गरजू मजूराला काम उपलब्ध करून देणारे देशातील पहिले राज्य आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील अकुशल व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देणे, आणि त्यायोगे जी कामे आहेत त्या कामांच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधने असा अत्यंत चांगला हेतू या कार्यक्रमापाठीमागे आहे.

त्यानंतर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम-२००५ (NREGA) याला संसदेने संमती दिली आणि २००८ एप्रिलपासून या योजनेची अंमलमजावणी सुमारे २०० जिल्ह्यात सुरुवात करून आता ती संपूर्ण देशभर त्याची अंमलबजावणी सुरूच आहे.

या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जी व्यक्ती अकुशल काम करण्यात तयार आहे अशा प्रौढ व्यक्तीला वर्षात १०० दिवस ६०, नवीन १०५ रु. दराने कामाची हमी देण्यात आली आहे. तसेच मजुरांचे जॉबकार्ड बनवून राष्ट्रीयकृत बँकेतून मंजूरी दिली जाईल. तसेच घरापासून कामाचे अंतर ५ कि.मी. पेक्षा जास्त असेल तर १०% जादा मजुरी मिळेल, तसेच महिलांना १५ दिवस पगारी प्रसुती रजा, स्त्री-पुरूष समान वेतन अशा असंख्य महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत.

या योजनेचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे शहराकडे ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर थांबवणे, महिलांचे सबलीकरण करणे, पर्यावरण रक्षण आणि प्रत्येक व्यक्तीस रोजगाराची हमी देणे.

रोजगार हमीच्या कामामध्ये शेततळे, कालवे खोदणे, पाण्याच्या निचऱ्यासाठी चर खोदणे, तलावातील गाळ काढणे, ग्रामीण रस्ते, रस्ते रुंदीकरण, स्मशानभूमीची कामे, पारंपारिक जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे, तलाव व बंधारे बांधणे अशी कामे पार पाडली जातात. या कार्यक्रमातील कामांची अंमलबजावणी करण्याची

जबाबदारी सरपंच, तलाठी, गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर आहे.

कामासाठी अर्ज केल्यानंतर १५ दिवसात काम किंवा निम्मा रोजगार भत्ता दिला जाणे आवश्यक आहे. याशिवाय महत्त्वाच्या तरतुदी म्हणजे कामाच्या ठिकाणी मजुरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, प्रथमोपचाराची व्यवस्था करणे ही बंधनकारक आहे. तसेच मजुराचा जर अपघाती मृत्यू झाला तर त्याच्या वारसाला ५०,००० रु. व अपंगत्व आल्यास योग्य अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

कामावरील स्त्री मजुरांच्या ३ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी पाळणा व दाई आणि निवाऱ्याची व्यवस्था करणे. तसेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास १४ दिवस व ७ दिवस रजा व सानुग्रह अनुदान देणे.

अशा प्रकारच्या अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी या योजनेअंतर्गत करण्यात आल्या आहेत.

या पद्धतीने ग्रामीण विकास साधण्यासाठी रोजगार हमी योजना ही एक अत्यंत महत्त्वाची योजना म्हणून उल्लेख करावा लागेल.

### ३.२.५ शैक्षणिक विकास कार्यक्रम (Educational Development Programme)

शिक्षण हा मानवी विकासाचा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. प्रत्येक मानवाच्या समाजाचा एक उपयुक्त घटक व्हावे यादृष्टीने त्याच्यातील क्षमता विकसित करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. व्यक्तीचे चारित्र्य घडविणे, नीतीमुल्यांची जोपासना, ज्ञान, कौशल्य व क्षमता विकसित करणे हे सुद्धा शिक्षणाचेच कार्य आहे. एकूणच व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाची संकल्पना ही शिक्षणातून अभिप्रेत आहे.

शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नाही तर त्याचा उद्देश अत्यंत व्यापक आणि उदात्त होता. गांधीजींच्या मते, शिक्षणाचा खरा संबंध चारित्र्य संवर्धन आणि कर्तव्याचे ज्ञान याच्याशी संबंधित आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतातील शिक्षणविषयक परिस्थिती अतिशय दयनीय होती. त्यामुळे 'सर्वांसाठी शिक्षण हे उद्दिष्ट कसे लवकर साध्य करता येईल याचा अत्यंत गंभीर विचार घटनाकारांनी केला. भारतीय संविधानाने शिक्षण या विषयाला योग्य महत्त्व दिले आहे. घटनेच्या नीतीनिर्देशक तत्त्वामध्ये अनिवार्य व निःशुल्क प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याचा उल्लेख केला आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात परिस्थिती गरजा, जागतिक परिवर्तने इत्यादींचा विचार करूनच शैक्षणिक धोरणे आखण्यात आली. एकात्मिक ग्रामीण विकासाशी संबंधित काही बाबी पुढील काही मुद्द्यांच्या आधारे समजावून घेता येतील.

**राष्ट्रीय लोकसंख्या – शिक्षण प्रकल्प :**

हा शिक्षण प्रकल्प १९८० मध्ये सुरुवात करण्यात आला. युनोच्या लोकसंख्या निधीने प्रथमतः प्रायोजित केला असून सध्या हा प्रकल्प केंद्र सरकारद्वारे चालवला जातो. या प्रकल्पात वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठी जन्मदर नियंत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे. आणि यासाठी वैद्यकीय मार्गावर भर देण्यात आला असून त्या अंतर्गत शालेय स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये लोकसंख्या शिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे. संस्कारक्षम वयात भावी नागरिकांना लोकसंख्या वाढीच्या परिणामांची गंभीरता, जाणीव करून देणे हा

या प्रकल्पाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :**

१९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाला सामोर ठेवून अंमलात आणले गेले. त्यात राष्ट्रीय शैक्षणिक दृष्टिकोन, शिक्षणपद्धतीत समानता आणणे, प्रौढ शिक्षणाला लोकांच्या चळवळीचे रूप देणे. प्राथमिक शिक्षणात गुणवत्तीचे वाढ, मुलींच्या शिक्षणावर भर देणे इ. गोष्टींचा समावेश या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आहेत. या धोरणांतर्गत वेगवेगळ्या राज्यांनी शिक्षण प्रसारासाठी वेगवेगळे उपक्रम राबवलेले आहेत.

**राष्ट्रीय साक्षरता अभियान (प्रौढ शिक्षण) :**

भारताच्या ग्रामीण भागामध्ये बहुसंख्य लोक निरक्षर आहेत. विशेषतः उत्पादक आणि जननक्षम वयोगटामध्ये निरक्षरता जास्त आढळून येते. या वयोगटातील लोकांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून राष्ट्रीय साक्षरता अभियानाची संकल्पना १९८८ मध्ये सुरुवात करण्यात आली. या अभियानांतर्गत वाचन, लेखन, अंकगणन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरणाचे संतुलन, स्त्री-पुरुष समता, छोटे कुटुंब या संदर्भातील जाणीव यामार्फत करून देण्यात येते. प्रौढ व्यक्तींच्या सोयीनुसार प्रौढ शिक्षण वर्गाची वेळ, अभ्यासक्रम, तांत्रिक साधनांची मदत यासंदर्भात तरतुदी, नियोजन करण्यात आले आहे.

सर्व साक्षरता प्रसार हा साक्षरता वाढीच्या व्यूहरचनेचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. जिल्हा साक्षरता समित्यांच्या मार्फत साक्षरता प्रसार, 'लोकसंपर्कातून जागृती' हे तत्त्व समोर ठेवून महिला सबलीकरण, सांप्रदायिक सद्भावना इत्यादीविषयी माहिती देण्यात येते.

**माध्यान्ह : भोजन योजना**

ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाकडे पालकांचा पाहण्याचा दृष्टिकोण फार महत्त्वपूर्ण नसतो किंवा शिक्षण हे गांभीर्याने घेतले जात नाही. मुलांना शाळेत पाठविण्यापेक्षा घरगुती व्यवसायात सहभागी करून घेणे ही प्रवृत्ती दिसते. ही वास्तवता लक्षात घेवून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पूरक आहाराचा कार्यक्रम त्याला माध्यान्ह भोजन योजना असे म्हटले जाते. हा कार्यक्रम १९९५ पासून सुरू करण्यात आला. त्यातून बालकांना पोषक आहार मिळून त्यांच्या आरोग्याचा दर्जा सुधारण्यावर भर देण्यात आला. गळतीचे प्रमाण कमी करणे हा सुद्धा यापाठीमागचा हेतू आहे.

काही शाळांमध्ये शिजवलेले अन्न न देता धान्य दिले जाते. अन्नधान्य आणि दळणवळणाचा खर्च केंद्र सरकारने स्विकारलेला आहे.

वास्तविक या योजनेचा हेतू खूप चांगला आहे परंतु या योजनेची प्रगती मात्र सर्व राज्यांमध्ये सारखी नाही म्हणून सर्वोच्च न्यायालयाला या योजनेच्या कालबद्ध अंमलबजावणीचे निर्देश द्यावे लागले.

याशिवाय निरंतर शिक्षण, अंगणवाड्या, बालवाड्या, आर्थिक स्तरानुसार शिक्षण शिष्यवृत्त्याची सोयही करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने २० ऑगस्ट २००३ पासून राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना सुरू केली आहे. यातून विद्यार्थ्याला २४ तास विम्याचे संरक्षण मिळते. या योजनेचा उद्देश असा की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अपघात विमा लागू करून सुरक्षाकवच लागू करणे तसेच थोड्या प्रमाणात का होईना नुकसानभरपाई देणे यामध्ये इयत्ता पहिली ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व वर्गांचा आणि विविध शाखांचा समावेश होतो.

**राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना**

ही योजना केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाची आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील इ. ९ वी व इ. १० वी मध्ये आणि पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना लागू आहे. यामध्ये कौटुंबिक उत्पन्न १ लाखापेक्षा जास्त नसावे. तसेच विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले असावेत, ही योजना खास करून गुणवंत परंतु आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची आहे. जेणेकरून या विद्यार्थ्यांना आपल्या आवडीप्रमाणे शिक्षण घेता येईल. हा या योजनेचा महत्त्वाचा उद्देश आहे.

एकूणच ग्रामीण विकास साधण्यासाठी ग्रामीण शैक्षणिक विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी शैक्षणिक सुविधा पुरविणे, गळतीचा प्रश्न थांबवण्यासाठी खास प्रयत्न शासनामार्फत होत आहेत. ग्रामीण भागातील पायाभूत शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी पुरेशा संसाधनांची सोय होणे आवश्यक आहे. या सर्व योजनांची योग्य अंमलबजावणी झाली तर नक्कीच ग्रामीण शैक्षणिक विकास गतीने होणार आहे.

## ३.२.६ आरोग्य विकास कार्यक्रम

उत्तम आरोग्य हीच व्यक्तीची खरी संपत्ती आहे असे म्हटले जाते. निरोगी व्यक्तींचा समाज कार्यक्षम व विकासप्रवृत्त असल्याने राष्ट्राला वेगाने पुढे नेऊ शकतो. यासंदर्भात डॉ. अमर्त्य सेन यांनी म्हटले आहे की, निरक्षरता, कुपोषण आणि योग्य आरोग्य निगेचा अभाव हे आदर्शमार्गी समाजाचे सर्वाधिक घातक शत्रू आहेत. यामुळेच भारतीय संविधानात आरोग्य सेवांना व निगेला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

सध्याच्या काळात विकासाचे मोजमाप करण्यासाठी ‘मानवी विकास निर्देशांक’ या कसोटीला विशेष महत्त्व दिले जाते. शैक्षणिक उपलब्ध, उत्पन्न आणि आयुर्मान या तीन घटकांवर हा निर्देशांक आधारलेला असतो. भारतामध्ये आरोग्य हा नागरिकांचा घटनादत्त अधिकार आहे. तो प्रत्येकाला मिळवून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. म्हणून आरोग्य हा मानवअधिकाराचा एक अविभाज्य घटक आहे हाच दृष्टीकोन समोर ठेवून जागतिक आरोग्य संघटनेने ‘सर्वांसाठी आरोग्य’ हे उद्दिष्ट साध्य करण्याचे सदस्य राष्ट्रांना आवाहन केले होते.

भारतातील आरोग्यसेवेच्या जडणघडणीत वेगवेगळ्या समित्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. विविध अहवालात आरोग्यसेवेच्या प्रतिबंधक व उपचारात्मक अशा दोन्ही बाजूंवर भर देऊन त्यांच्यातील समन्वयाची आवश्यकता प्रतिपादित केली. दहा हजार ते वीस हजार लोकसंख्येसाठी एक या प्रमाणे ग्रामीण आरोग्य केंद्रे सुरू करण्याची शिफारस समितीने केली.

आरोग्यनिगेचा विचार करताना आपला दृष्टीकोन बहुआयामी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वच्छता,

शुद्ध पेयजल, सकस आहार इ. माध्यमातून विशिष्ट परिसरात आरोग्यवर्धक वातावरण तयार करणे, रोगांना प्रतिबंध करणे, आरोग्य केंद्रे स्थापन करणे, ग्रामीण आरोग्य केंद्रे निर्माण करून ग्रामीण लोकांच्या आरोग्याचा स्तर उंचावणे, त्यांना गावातच आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहे.

**संपूर्ण स्वच्छता अभियान :** महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य अभियान (२००५ ते २०१२)

अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगांना प्रतिबंध व्हावा म्हणून ग्रामीण भागातील पाण्याची स्वच्छता राखणे, परिसर स्वच्छता ठेवणे यासाठी २००५-२०१२ या कालावधीत हे अभियान हाती घेण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य व शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे, घराघरात शौचालये बांधण्यासाठी जनतेला प्रवृत्त करणे व उघड्यावरील शौचाची प्रथा संपुष्ठात आणणे, पाणी स्त्रोत प्रदुषणविरहित करणे, व्यक्तीगत आणि परिसर स्वच्छतेच्या माध्यमातून प्रदूषण थांबविणे व पर्यावरणाचा समतोल राखणे, सांडपाण्याची, घनकचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, ग्रामीण भागातील आरोग्य विषयक पायाभूत सुविधात वाढ करणे, आवश्यक औषधासाठी निधीची उपलब्धता, इमारत, दूरध्वनी, मेडिकल युनिटस, रुग्णवाहिका, प्रत्येक गावात १००० लोकसंख्येच्या मागे एका 'आशा'ची नियुक्ती केली जात आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान** (NRHM)

दि. १२ एप्रिल २००५ रोजी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरुवात झाली. ग्रामीण भागातील गरीब महिला आणि बालकांपर्यंत गुणवत्तापूर्ण, परिणामकारक आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात पुरविणे हे मुख्य ध्येय आहे. यातून माता-बाल मृत्यूदर कमी करणे, पोषक आहार, शुद्ध व स्वच्छ पाणी पुरवठा, संसर्गजन्य रोगांना प्रतिबंध, लोकसंख्या नियंत्रण अशा तरतुदी या अभियानामध्ये आहेत.

या अभियानामध्ये पुढील काही बाबी महत्त्वाच्या आहेत. राज्यभर हे अभियान कार्यरत करणे, सर्व केंद्रांना ए. एन. एम. असावी, नर्सेस असाव्यात, 'आयुष' प्रणालीचा प्रसार करावा. जननी सुरक्षा योजनेचा लाभ सर्वांना मिळावा, फिरते वैद्यकीय पथक कार्यरत करावे, अशा काही महत्त्वपूर्ण तरतुदी आरोग्यविषयक सुविधांमध्ये करण्यात आल्या आहेत.

**हृदयरोग, कॅन्सर, किडनीने पिडीत रुग्णास जिल्हा परिषद स्वीय सहाय्य निधी :**

ग्रामीण भागात राहाणाऱ्या नागरिकाला महाराष्ट्रातील जिल्हा परिषदाकडून या अशा दुर्धर आजारात रु. ५,०००/- मदत केली जाते. तसेच यासंदर्भातील शस्त्रक्रिया व औषधोपचारासाठी येणारा खर्च हा प्रचंड असतो त्यामुळे संबंधित व्यक्तीस थोडासा दिलासा मिळतो.

**जीवनदायी आरोग्य योजना :**

ही योजना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी सुरुवात करण्यात आली आहे. विविध दुर्धर आजार, मेंदू, किडनी, कर्करोग, हृदयरोग यांच्या शस्त्रक्रियेसाठी दीड लाखापर्यंतचा निधी दिला जातो.

एकूणच ग्रामीण आरोग्य विकास साधण्यासाठी विशेष आरोग्य सेवांसाठी तंत्रज्ञानाची मदत घेत आहेत. 'टेली-मेडिसीन' प्रकल्पाच्या माध्यमातून एक क्रांतिकारक पाऊल उचलण्यात येत आहे. दुर्गम भागातील गावांचा सुद्धा अत्याधुनिक रुग्णालयातील संपर्क स्थापन करणारा हा एक महत्त्वाकांक्षी पथदर्शक प्रकल्प आहे.

वैद्यकीय शिक्षण संस्थांची पुरेशी तरतुद करणे, फिरती रुग्णालये मोठ्या प्रमाणावर निर्माण करणे, प्राथमिक आरोग्य केंद्रांना स्वयंपूर्ण आणि मजबूत बनवणे हे राष्ट्रीय ग्राम–आरोग्य मिशनचे लक्ष्य आहे. तसेच ग्रामीण भागात ज्या आरोग्य विषयक सुविधांच्या त्रुटी आहेत त्या दूर करून ग्रामीण आरोग्य जास्तीत जास्त चांगले कसे करता येईल याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

### ३.२.७ ग्रामीण विकासातील महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान :

भारताच्या आर्थिक नियोजनामध्ये ग्रामीण विकास हा एक महत्त्वपूर्ण भाग मानला गेलेला आहे. 'भारताचे खरे दर्शन खेड्यांमध्येच होते आणि 'ग्राम' हा भारताचा आत्मा होय' हा महात्मा गांधी यांचा विचार आजही खरा आहे. 'विकास' हा शब्द प्रगत अवस्था किंवा प्रगती, उन्नती सूचित करतो. ग्रामीण भागाच्या संदर्भात असे म्हणता येईल की ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या भौतिक, सामाजिक आणि आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे म्हणजे विकास होय. एकूणच ग्रामीण लोकांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणून त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, चांगले आरोग्य, निवास आणि इतर सामाजिक सुविधा यांच्यात सुधारणा घडवून आणणे होय.

भारतीय ग्रामविकासाच्या संदर्भात काही भारतीय विचारवंतानी आपले योगदान दिलेले आहे. ते पुढीलप्रमाणे–

**महात्मा गांधी यांचे ग्रामविकाससंबंधीचे विचार**

अत्यंत प्राचीन काळापासून भारत ही ग्रामीण समुदायाची धरती राहिली आहे. वैदिक काळापासून प्रशासनाचे मुलभूत एकक हे खेडेगाव आहे. ग्रामीण विकास साधण्यासाठी ग्रामीण लोक आणि शेतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कोणतेही सामाजिक आर्थिक विकासाचे धोरण त्याशिवाय यशस्वी होणार नाही.

महात्मा गांधीजींनी भारताच्या प्राचीन वैभवाचा आणि ग्रामसंपन्नतेचा व आधुनिक समाजव्यवस्थेचा अभ्यास केलेला होता. 'भारत हा खेड्यांचा देश आहे, खेड्यातील जनतेचा विकास हाच भारताचा विकास आहे.' अशी भूमिका म. गांधीजींनी घेतली होती.

अर्थव्यवस्थेचे ग्रामीण वैशिष्ट्य आणि ग्रामीण जीवनाच्या पुनर्निर्मितीची गरज यावर गांधीजींनी भर दिलेला होता. 'हरिजन'मध्ये गांधीजींनी लिहिले होते की,

'भारत त्याच्या मोजक्या शहरांमध्ये सापडणार नाही, तर सात लाख खेडेगावात सापडेल, परंतु आपण शहरवासी यांनी असे मानले आहे की, भारत शहरामध्ये सापडेल आणि आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी गावांची निर्मिती केली गेली. त्या गरीबांना पुरेसे अन्न आणि वस्त्र मिळते का आणि ऊन–पावसापासून संरक्षणासाठी त्यांना छत्र आहे का याबाबत चौकशी करण्यासाठी आपण क्वचित थांबतो. तसेच पुढे असेही लिहितात की,

''मी म्हणेन की जर गावांचा नाश झाला तर, भारताचाही नाश होईल. मग तो भारत नसेल, जगातले त्यांचे स्वतःचे विशिष्ट कार्यही गमावले जाईल. जेव्हा खेडेगावांचे शोषण थांबेल तेव्हाच खेडे गावांना पुनरुज्जीवीत करणे शक्य आहे.''

त्यामुळे ग्रामीण विकास हा भारतासाठी अत्यंत तातडीची गरज आहे आणि याची गरज भविष्यातही

राहणार आहे. भारताच्या विकासाचा हा एक अपरिहार्य घटक असणार आहे. अशी भूमिका त्यांची होती. यासाठी प्रथमतः चंपारण्य आणि खेडा जिल्ह्यातील 'साराबंदीचा' सत्याग्रह केला होता. त्यांच्या ग्रामीण विकाससंदर्भात कृती आणि विचाराला चालना मिळाल्याचे दिसून येते.

भारताला समृद्ध आणि संपन्न घडवायचे असेल तर खेड्याकडे चला, खेडी जोपर्यंत स्वयंपूर्ण, स्वावलंबी आणि स्वयंवासित होणार नाहीत तोपर्यंत भारत समर्थपणे उभा राहू शकत नाही. खेड्यांचे प्रश्न अधिक बिकट आहेत ते सोडविल्याशिवाय त्यांच्या भाकरीचा प्रश्न मिटवल्याशिवाय ग्रामीण विकासाला अर्थ नाही हे गांधीजींनी अनुभवाने जाणलेले होते.

गांधीजी सदैव ग्रामीण लोकांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक, धार्मिक आणि सांस्कृतिक विकासासाठीच धडपडत असत. आपल्याला गावांच्या विकासासाठी, उत्कर्षासाठी शीघ्रगतीने प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी त्यांनी 'हिंद स्वराज्य' हे पुस्तक लिहून महान भारताची कल्पना केलेली होती. ज्यामध्ये 'स्वयंपूर्ण खेडे' हा राष्ट्रीय प्रणालीचा महत्त्वाचा घटक असेल.

म. गांधीजींच्या संदर्भात भारतन कुमारप्पा लिहितात की, ''गांधीजी स्वतःला ग्रामवासी मानत असत. इतर विकासाला अर्थ नाही हे म. गांधींनी स्वअनुभवाने जाणले होते. गावांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांनी अनेक संस्था सुरू केल्या होत्या.

गांधीजींनी ग्रामीण विकासाची जी परिकल्पना केली होती ती एक आदर्श आणि समग्र अशा विकासाची परिकल्पना होती. गांधीजींनी आदर्श गावासंदर्भात जी कल्पना मांडली होती त्यासंदर्भात ते असे म्हणतात की आदर्श गावाची निर्मिती अशा पद्धतीने केली पाहिजे की जे संपूर्णतः निरोगी असेल, त्यातील घरे आणि झोपडपट्टीत पुरेसा प्रकाश आणि हवा खेळती असेल, घराच्या मागेपुढे पुरेशी रिकामी जागा असावी, जिथे झाडे, भाजीपाला घेता येईल, पाण्याचे स्त्रोत, विहीरी, प्रार्थना आणि उपासना स्थळ, सहकारी तत्त्वावरील गोशाळा, शाळा, औद्योगिक प्रशिक्षणाची सोय गावाच्या गरजा गावातच भागवल्या जातील यादृष्टीने गावातच उत्पादन असले पाहिजे. अशी त्यांची आदर्श गावाची कल्पना होती.

गावामध्ये सामुदायिक कृषी योजना, एकात्मता, कृषी उद्योगांचा समग्र विकास, सामाजिक सेवा, संस्कृती, स्वतंत्रता, मानवोत्कर्ष इ. केंद्र हे गाव असले पाहिजे.

शेतीच्या विकासाबरोबरच खादीचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे तरच ग्राम उद्योगाचे अनेक दरवाजे उघडतील. कारण खादी आणि ग्राम उद्योग हे एकमेकांवर अवलंबून असतात. गांधीजी हे 'चरख्याला' 'जीवनदाता सूर्य' मानतात तसेच ते ''चरख्याला देशाच्या समृद्धीचे आणि स्वातंत्र्यलढ्याचे चिन्ह मानत असत.'' त्यांच्या मते चरखा लोकांची गरीबी आणि बेकारी दूर करू शकतो.

गांधीजी अशा ग्रामस्वराज्यांची निर्मिती करू इच्छित होते की, ज्यामध्ये एक शोषण विहीन सामाजिक, आर्थिक, समानता असेल, विश्वस्तमंडळ असेल, की ज्यातून गांधीजी आर्थिक समानता स्थापित करू इच्छित होते.

गांधीजींनी १९४५ साली नेहरूंना लिहिलेल्या पत्रात असे लिहिले आहे की, ''माझ्या आदर्श गावात बुद्धीमान व्यक्ती असतील ते पशुप्रमाणे घाणीच्या साम्रज्यात, अंधकारमय वातावरणात राहणार नाहीत, पुरूष

व महिला स्वतंत्र असतील, प्लेग, अतिसार देवी हे आजार नसतील, कोणी बेकार नसतील, रेल्वे, डाक, तार इ. सुविधा सर्वांना असतील आणि गाव आणि शहर यांच्यात संपूर्ण समन्वय राहिल.''

एकूणच गांधीजींचा विचार हा खेड्यांकडे चला असा होता. आज गावकऱ्यांचे रोजगारासाठी शहरांकडे वाढू लागलेले लोंढे आणि शहरातील विविध प्रश्न बघता गांधीजींचा मंत्र किती महत्त्वाचा आहे हे लक्षात येते.

ग्रामीण विकास साधण्यासाठी, विविध योजना सर्व शिक्षा अभियान, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त अभियान, म. गांधी तंटा मुक्त गाव अभियान, या गोष्टी महत्त्वाची भूमिका घेत आहेत.

एकूणच म. गांधीजींची ग्रामस्वराज्याची, म्हणजे ग्रामीण विकासाची संकल्पना वास्तववादी होती. तसेच त्यांचे धोरण ही समतोल आणि सर्वांगिण विकासासाठी होते हे निश्चित आहे.

अशा प्रकारे म. गांधीजींचे ग्राम विकासासंदर्भातले योगदान स्पष्ट करता येईल.

**पंडित नेहरू यांचे ग्रामीण विकाससंबंधीचे विचार :**

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे भारताच्या विकासातील योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हटले आहे. नेहरूंनी औद्योगिक विकासावर भर दिला होता. त्यांच्या मते, ''अगोदर भारतीय अर्थव्यवस्था मजबूत केली पाहिजे. ज्यामुळे विदेशी मदतीचे परावलंबित्व संपुष्टात येईल. देशाच्या संरक्षण व्यवस्थेच्या दृष्टीनेही ते अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याशिवाय देशाचा आर्थिक विकास होऊ शकणार नाही.''

पं. नेहरूंच्या या विकासाच्या नीतीमुळे भारताने जगातील औद्योगिक राष्ट्रांमध्ये १० वे स्थान प्राप्त केलेले आहे.

पं. नेहरूंनी म. गांधीजींचे पंचायतराजचे स्वप्न साकार करून ग्रामीण विकासासाठी प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते. २ ऑक्टोबर १९५९ रोजी म. गांधींच्या जयंतिदिनी पं. नेहरू यांनी राजस्थानमधील 'नागौर' येथे 'लोकशाही विकेंद्रीकरणासाठी त्रिस्तरीय पंचायतीराजची' स्थापना केली. या प्रसंगी उद्घाटनपर भाषणात ते म्हणाले की, ''माझा हा निश्चय झाला आहे की सत्तेचे अधिकाधिक विकेंद्रीकरण झाले पाहिजे, सत्ता गावांना सोपविली पाहिजे, या त्रिस्तरीय व्यवस्थेत ग्रामशासनाचा आधारभूत घटक ग्रामपंचायत असेल परंतु विकास कार्यासंबंधीचा मुख्य घटक पंचायत समिती असेल आणि जिल्हा परिषद समन्वय साधने व सल्ला देण्याचे कार्य करेल.

नेहरूंनी पंचायत राज्य संस्थाना म्हणजे ग्रामवासियांना चुकत चुकत शिकण्याची संधी दिली. नेहरूंवर गांधीजींचा आणि रशियातील साम्यवादाचा प्रभाव होता. परंतु याउलट चीनने कृषीविकास आणि औद्योगिकरण यांचा बरोबरीने विकास केला आहे. चीनी लोक याला 'दोन पायावर चालण्याचा सिद्धांत' असे म्हणतात. त्यामुळे आज घडीला चीन जगातील सगळ्यात शक्तीशाली आणि बलाढ्य राष्ट्र आहे.

एकूणच नेहरूंच्या ध्येयधोरणामध्ये अवजड उद्योगांच्या उभारणीला चालना दिली गेली.

नेहरूंच्या ग्रामीण विकासाच्या नीतीमुळे, संकरित बी-बियाणे व रासायनिक खतांच्या तंत्रज्ञानाने कृषी उत्पन्नात वाढ झाली, भारत अन्न धान्यात स्वयंपूर्ण झाला आहे, तसेच कृषी, सिंचन सुविधा, वीज उत्पादन, परिवहन आणि दळणवळणाच्या क्षेत्रातील सुविधा या कृषी अर्थव्यवस्थेला पोषक ठरलेल्या आहेत. विज्ञान

तंत्रज्ञानाचा विकास व व्यवस्थापकीय घटकांची स्थापना आणि विकास झालेला आहे. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पंचायती राज्याच्या निर्मितीमुळे लोकशाहीचे विकेंद्रीकरणाची प्रक्रिया घडून आली आहे आणि ग्रामीण विकासाला चालना मिळालेली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रामीण विकासातील योगदान :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रामीण विकासातील योगदानाबाबत लिहित असताना असे म्हणावे वाटते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार आणि दलितांचे कैवारी म्हणून सर्वपरिचित आहेतच परंतु बाबासाहेब हे शेतकऱ्यांचेही कैवारी होते. ग्रामण भागाचे हितरक्षक आणि शेतकऱ्यांच्या परिवर्तनासाठी मांडलेले विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. डॉ. आंबेडकरांना ग्रामीण समाजव्यवस्थेची प्रचंड जाण होती. तितकेच शेतीबद्दलही भान होते. ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंघ करायचा तर शेतीचे चित्र बदलले पाहिजे याबाबत ते अत्यंत आग्रही होते. आपल्या देशातील शेतकरी आणि राज्यकर्ते यांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शेती. तर हा राष्ट्रीय उत्पन्नाचा स्त्रोत आहे.

ग्रामीण आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू म्हणून शेतीकडे बघणे आवश्यक आहे असे मत बाबासाहेबांनी व्यक्त केले. शेतकऱ्यांसह अनेक शेतमजुरांना रोजगार देण्याचे माध्यम शेती आहे. एक उद्योग म्हणून त्याकडे बघावे यासाठी बाबासाहेब आग्रही होते. ग्रामीण शेती सक्षम बनली तरच ग्रामीण विकास होईल. रोजगारासाठीची स्थलांतरे टळतील. इतक्या व्यापक आणि सखोल दृष्टीने त्यांनी शेतीकडे बघीतलेले होते.

विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या शेषणाबाबतचे त्यांचे विचार अत्यंत परखड होते. शासनाकडून पुरेसे आर्थिक पाठबळ न मिळाल्यामुळे शेतकरी सावकारांचा आधार घेतात आणि त्यांची कशी पिळवणूक होते याचा कडक शब्दात समाचार ते घेतात.

कष्ट शेतकऱ्याने करायचे आणि खोतकऱ्यांना फुकटचे खायचे हे त्यांना मान्यच नव्हते. ते खोतांना 'आयत्या बिळावरचे नागोबा' असे म्हणत.

ग्रामीण विकास साधण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, पाणी, पीक जोपासनेचा खर्च दिला पाहिजे. शेतीचे आर्थिक उत्तरदायित्व शासनाने उचलावे असेही ते म्हणतात.

ग्रामीण भागातील जातीवर आधारित समाजव्यवस्थेचे कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेत शोधलेले होते. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्था बदलायची तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल असा महत्त्वपूर्ण विचार मांडला.

शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकरी हा आर्थिक दृष्टीने सक्षम झाला पाहिजे. शेतमजूर यांना आर्थिक सक्षमतेचा फायदा झाला पाहिजे. आर्थिक स्त्रोत तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजेत. ग्रामीण लोकांच्या मानसिकतेमध्ये बदल करणे आवश्यक आहे. आर्थिक विषमता ही जातीय व्यवस्थेला पूरक व पोषक ठरणारी आहे. त्यामुळे ती जेवढी कमी होईल तेवढी विषमता कमी असा त्यांचा विचार होता.

पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. अशावेळी शेतीसाठी शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळणे आवश्यक आहे. शेतीची उत्पादकता वाढवणे, नदीच्या पाण्याचे नियोजन हे शाश्वत पुरवठ्याप्रमाणे करणे

महत्त्वाचे आहे. दुष्काळात पाण्याचे नियोजन करणे ही गरजेचे आहे. बागायती शेती करण्यावर भर दिला पाहिजे असे विचार ब्रिटीशांसमोर व्यक्त केले. एवढेच नव्हे तर ब्रिटीश सरकारला नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली.

तसेच ग्रामीण विकासातील सर्वात महत्त्वाची संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली होती ती म्हणजे 'शेतीचे राष्ट्रीयीकरण' करण्याची त्यामध्ये शासनाने शेतजमिनी ताब्यात घेवून त्या विकसित कराव्यात. त्या काही अटींवर कसण्यासाठी द्याव्यात, काही नियम शासनाने तयार करावेत. एक प्रकारे सामुदायिक शेतीचाच तो प्रयोग असेल. पीक पद्धती, पाण्याची उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवणीची व्यवस्था, शेतमालाची विक्री भाव, यासंदर्भातील नियम स्पष्ट करावेत. शेतमालाचे नुकसान टळून रास्त भाव मिळेल. म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीसाठी अधिनियम आणि कायदा असावा ही संकल्पना खूपच महत्त्वाची होती.

डॉ. बाबासाहेबांच्या संकल्पनेतूनच कमाल जमीन धारणा कायदा, सामुहिक शेती प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्या खोऱ्यांची विभागणी व विकास जलसंवर्धन योजना या अंमलात आणल्या गेल्या.

डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे प्रभाव असणारे कायदे शासनाने केले आहेत. त्याची योग्य व काटेकोर पद्धतीने अंमलबजावणी झाली तर नक्कीच ग्रामीण विकासाची संकल्पना साकार होईल.

एकूण म. गांधी, पं. नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रामीण विकाससंदर्भातले योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. या विचारांच्या अंगीकाराने नक्कीच ग्रामीण विकासाला चालना मिळणार आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न–१**

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) कृषी विषयक सुधारणाचा विचार करण्यासाठी ................ सालात रॉयल कमिशन नियुक्त केले.

२) श्री. स्पेन्सर हॅच यांनी ............... या प्रकल्पाची सुरुवात केली.

३) पंजाबमधील गुरगाव प्रकल्प ............... यांनी सुरुवात केला.

४) .................. या वर्षापासून महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवडीचा कार्यक्रम सुरू करण्यात आला.

५) ......................... या वर्षी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियमाला (NREGA) संमती दिली.

६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरुवात ........... या वर्षी करण्यात आली.

७) चंपारण्य व खेडा जिल्ह्यातील सत्याग्रह ............ यासाठी होता.

८) दोन पायावर चालण्याचा सिद्धांत वापर ............. हा देश बलशाली बनला.

९) डॉ. आंबेडकरांनी ग्रामीण समाजव्यवस्थेतील कोणाला 'आयत्या बिळावरचे नागोबा' असे म्हटले

आहे.

१०) जातीवर आधारित समाजरचना बदलायची असेल तर त्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावे लागेल असा विचार .......... यांनी मांडला.

## ३.३ सारांश

भारताच्या स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर आपण माहिती तंत्रज्ञान, अंतराळ, संशोधन, औद्योगिकरण इत्यादी क्षेत्रामध्ये उत्तुंग भरारी घेतली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपासून आपण ग्रामीण विकासाचे मूल्यमापन केले तर खूप आशादायी चित्र डोळ्यासमोर दिसून येत नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये ग्रामीण विकासासाठीच्या विविध योजना तयार केल्या आहेत. काही प्रमाणात त्या योजनांची अंमलबजावणी होत आहे. तरीही सर्वच योजना जे लाभार्थी आहेत त्यांच्यापर्यंत जात नाहीत. यासाठी राजकीय नेतृत्व आणि नोकरशाही व्यवस्था कारणीभूत आहेत.

ग्रामीण विकासाचे ध्येय १०० टक्के गाठण्यासाठी नियोजनपूर्वक, योग्य दिशेने, योग्य व्यक्तीने अधिक जाणीवतेने, क्षमतेने, संवेदनशीलतेने ग्रामीण विकासाच्या प्रत्येक योजनेकडे बघितले पाहिजे. योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी झाली पाहिजे याकडेही कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. 'तीव्र गतीने आणि अधिक सातत्यपूर्ण विकास' हे मुख्य सुत्र मनाशी बांधून ग्रामीण विकास साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १) १९२८ | २) मार्तंडम प्रकल्प | ३) श्री. ब्रायन | ४) २१ जून १९९० |
| ५) २००५ | ६) २००५ | ७) साराबंदी | ८) चीन |
| ९) खोत | १०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर | | |

## ३.५ स्वाध्याय

### दीर्घोत्तरी प्रश्न

१) स्वातंत्र्यपूर्व भारतातील ग्रामीण विकास कार्यक्रम थोडक्यात विशद करा.

२) कृषी विकासातील विविध योजनांची चर्चा करा.

३) 'रोजगार हमी योजना कार्यक्रम' यावर निबंध लिहा.

४) ग्रामीण विकासातील महात्मा गांधी यांचे योगदान स्पष्ट करा.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके (संदर्भ ग्रंथ)

१) श्री. गंगाधर कराळे, (२००६) 'ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोण' नीती, कार्यक्रत आणि धोरण, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) प्रा. डॉ. भगवान सांगळे, (२०११) 'ग्रामीण विकास योजना : दशा व दिशा', मुक्तरंग प्रकाशन, लातूर.

३) कटार सिंह, अनिल शिशोदिया, (२०१६) 'ग्रामीण विकास, तत्त्वे धोरणे आणि व्यवस्थापन, सेज प्रकाशन, न्यू दिल्ली.

४) डॉ. आशिष देशमुख, (२०१५) 'ग्रामविकासाचा पासवर्ड', विजय प्रकाशन, नागपूर.

५) A. R. Desai, Rural Sociology in India

६) प्रा. चंद्रकांत खंडागळे, 'ग्रामीण समाजशास्त्र', सौ. मायादेवी खंडागळे, प्रकाशन, सांगली.

७) प्रा. ए. वाय. कोंडेकर, प्रा. पी. व्ही. चांदोरकर, 'ग्रामीण समाजशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८) नलिनी पंडीत (२००१) 'जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय ग्रह, मुंबई.

९) Rakhi Sharma (2016), 'Rural Development' a Modern Approach, DND, Publication, Jaipur.

१०) Kiely Ray and Phil Marfket (1998) 'Globalization and the third world' MCmillan, London Routledge

११) प्रा. डॉ. सतीश डोंबरे (२००६), जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

❑❑❑

## घटक ४
# ग्राम विकासातील प्रमुख समस्या
## (Major Problems in Rural Development)


४.० उद्दि्ष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ ग्राम विकासातील समस्या

४.२.२ जागतिकीकरण आणि ग्रामविकासातील प्रश्न

४.३ सारांश

४.४ सरावासाठी प्रश्न

४.५ अधिक वाचनासाठी संदर्भ


### ४.० उद्दिष्टे (Objective) :

१. ग्रामविकासातील प्रमुख समस्या जाणुन घेणे.

२. समस्यांच्या अनुरोधाने मुल्यमापन लक्षात घेणे.

३. जागतिकरणातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा मागोवा घेणे.

### ४.१ प्रस्तावना :

देशाचा विकास आणि समृध्दी ही प्रामुख्याने खेडयांवर अवलंबून आहे असे वारंवार बोलले जाते. तसेच खेडयांकडे जर दुर्लक्ष केले तर देशाच्या भवितव्याशी धोका पोहोचेल असे मानले जाते. साहजिकच ग्रामीण विकास हा एक कळीचा मुद्या शासनासमोर नेहमीच बनून राहिला आहे. भारतासारख्या देशात तर, की जिथे ग्रामीण क्षेत्र अधिक आहे. तिथे तर ग्रामविकासावर अधिक लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. सध्या तर देशाच्या पंतप्रधानांनी समाजातील विविध घटकांना ग्रामीण विकासाच्या संदर्भात लोकसभा सदस्याने (खासदार) तीन खेडे दत्तक घेऊन ती विकसित करावीत असे आवाहन केले आहे. अर्थात ग्रामविकास ही केवळ एकट्या सरकारची जबाबदारी नाही, तर त्यामध्ये लोकांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. पण भारतासारख्या अवाढव्य देशात आणि जिथे ग्रामीण क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे तिथे अशा ग्रामविकासाचे आव्हान फार मोठे

आहे. त्यात अनेक समस्या आहेत. त्यासाठी फार मोठी भांडवली गुंतवणूकीची, शिस्तबध्द नियोजनाची ध्येयधोरणांच्या काटेकोर अंमलबजावणीची गरज आहे. मुळात ग्रामीण भागातील ज्या पारंपारिक समस्या आहेत त्यांचा फार मोठा अडसर आहे. प्रस्तुत भागात अशा समस्या कोणत्या आहेत ते आपण जाणून घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

या घटकामध्ये प्रथम ग्रामीण विकासामध्ये असणाऱ्या प्रमुख घटकांचा अभ्यास करणार आहोत व त्यानंतर ग्रामीण विकास साधण्यामध्ये ज्या समस्या अडथळा ठरत आहेत. त्या समस्यांचा अभ्यास पहल्या भागात करणार आहोत आणि दुसऱ्या भागात प्रथम जागतिकीकरणाचा अर्थ व संकल्पनांचा अभ्यास करून त्यानंतर जागतिकीकरणातून निर्माण होणारे ग्रामविकासातील प्रश्नांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

### ४.२.१ ग्रामविकासातील प्रमुख समस्या (Major Problems in Rural Development)

विकास हा शब्द प्रामुख्याने प्रगत अवस्था अथवा उन्नती सुचित करतो. ग्रामीण संदर्भात असे म्हणता येईल की, ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या भौतिक, सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे म्हणजे विकास. वेगवेगळया विचारवंताना ग्रामीण विकासाच्या भिन्नभिन्न पैलूवर भर देऊन आपापला दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. त्यापैकी मायकेल टोलॅरो यांची संकल्पना महत्वपूर्ण उद्दिष्टांना समाविष्ट करणारी वाटते. त्यांच्यामते ग्रामीण विकासामध्ये पुढील घटकांचा समावेश असला पाहिजे.

१. शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवास व इतर सामाजिक सुविधा यांच्यासह राहणीमानाच्या पातळीत सुधारणा होणे.

२. ग्रामीण भागातील उत्पन्नाच्या वितरणातील, तसेच ग्रामीण नागरी उत्पन्न व आर्थिक संधी यातील तफावत कमी करणे.

३. उपरोक्त सुधारणांची गती सातत्यपूर्ण ठेवण्यासाठी ग्रामीण क्षेत्राची क्षमता वाढविणे.

ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत जे पैलू खऱ्या अर्थाने अतिशय महत्वाचे आहेत. त्यांचा विचार या संकल्पनेत केलेला आढळतो. वास्तवात या गोष्टी ग्रामीण भागातील लोकांना उपलब्ध होणार का ? होत असल्यास किती प्रमाणात होतात. ग्राम विकासात तेथील लोकांचा सहभाग किती असतो ? शासकीय योजना ग्रामविकासाला पुरेशा आणि पूरक ठेवतात काय ? कोणकोणत्या कारणामुळे ग्रामविकासात अडथळे निर्माण होतात आणि त्यातून कोणत्या समस्या प्रामुख्याने निर्माण होतात असे असंख्य प्रश्न निर्माण होताना दिसतात. हे प्रश्न अथवा समस्या नेमक्या कोणाच्या आहेत आणि त्यांची अक्कल कितपत आणि कसे शक्य आहे याचा विचार याठिकाणी करावयाचा आहे. तसेच ग्रामीण विकासाचे अनेक कार्यक्रम राबविले जात असुनही तेथे किमान आवशयक गरजाही पूर्ण होत नसल्याचे दिसते. त्यामुळे प्रश्न गंभीरपणे विचारुन घेणे आवश्यक आहे.

ग्रामीण विकासाची एकूण प्रक्रियाच अतिशय गुंतागुंतीची असून तिच्या संबंधीत घटकांची संलग्नता न विसरता एकात्मिक दृष्टिकोनातून तिचा विचार करणे व्यवहार्य ठरेल. या पार्श्वभूमीवर ग्रामीण विकासात ज्या समस्या अडथळा ठरत आहेत. त्यांचा परामर्श पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

**१. ग्रामीण दारिद्र्य :**

ग्रामीण विकासासाठी पायाभूत सोयी उपलब्ध करून देखील ग्रामीण गरीब, आर्थिकदृष्टया मागासवर्गीयांना त्याचा फारसा फायदा झाला नाही.

अत्यंत मुलभूत व जगण्यासाठी आवश्यक अशा गरजांची पूर्तता करता न येण्याची स्थिती म्हणजे दारिद्र्य अशी दारिद्र्याची सोपी व्याख्या केली जाते.

१२७९ मध्ये प्रा. वि. म. दांडेकर व प्रा. निळकंठ यांनी आपल्या पुस्तकात (भारतातील दारिद्र्य - Poverty in India) दारिद्र्याचे दरडोई खर्चाच्या आधारावर निकष ठरवून दिले. त्या निकषाच्या आधारे त्यांनी ग्रामीण भागातील ४०% जनता दरिद्री आहे हे स्पष्ट केले. आजही ग्रामीण दारिद्र्याचे नेमके प्रमाण काय किती आहे हे स्पष्ट करणे कठीण आहे. तरीही ग्रामीण भागातील जवळपास ४०% लोकसंख्या दारिद्र्य रेषेच्या आसपास आहे. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार हया मुलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत.

**२. ग्रामीण बेकारी :**

ग्रामीण समस्या ही सार्वत्रिक स्वरुपाची आहे, परंतु ग्रामीण भागातील बेकारीचे स्वरुप बऱ्याच अशी वेगळे दिसते. ग्रामीण भारतातील बेकारी ही पुढील कारणामुळे तीव्र बनली आहे.

भारतीय शेतीचे मागासलेपणा :

भारतीय शेती ही सामान्यपणे मागास, अप्रगत समजली जाते. अल्पभूधारकता, शेतीवरील अवलंबित्व, लोकसंख्येचा मोठा ताण, भांडवलाची कमतरता, निसर्गावलंबन, शेतीचे हंगामी स्वरुप, पाणी, आधुनिक तंत्रज्ञान, खते बी-बीयाणे यांची कमतरता, शेतीमाल बाजार पेठांच्या समस्या इत्यादी विविध कारणामुळे भारतीय शेती ही सामान्यपणे अप्रगत, मागास मानली जाते. साहजिकच शेतीचे मागासलेपणा रोजगार निर्मितीला मर्यादा आणणारे ठरते.

**शेतीचे हंगामी स्वरुप :**

भारतात बहुतांश शेती ही हंगामी स्वरुपाची आहे. म्हणजेच वर्षातील केवळ सहा ते सात महिनेच शेतीचे काम चालते. त्यामुळे त्याच काळात रोजगार उपलब्ध होतो.

**ग्रामीण लोक संख्यावाढ :**

दारिद्र्य, दैववाद, परपरांवादी वृत्ती, निरक्षरतेचे मोठे प्रमाण यामुळे ग्रामीण भागात लोकसंख्यावाढ वेगाने होत आहे, पण त्या प्रमाणात रोजगारीची संधी वाढत नसल्यामुळे बेकारांची लोकसंख्या मात्र वाढत आहे.

**ग्रामीण लघू व कुटीर उद्योगांचा ऱ्हास :**

पूरक व्यवसायांचा तुटवडा, ग्रामीण औद्योगिकरणाची मंद गती, दारिद्र्य, उत्पादनाचे आक्रमण ही अन्य कारणेही ग्रामीण बेरोजगारीसाठी महत्वाची आहेत. ग्रामीण बेकारीची अचूक प्रमाण दर्शविणे अवघड आहे. परंतु एवढे मात्र म्हणता येते की, ग्रामीण भागात आढळणाऱ्या छुप्या किंवा प्रछन्न बेकारीचे प्रमाणही मोठे आढळते.

**३. कर्ज बाजारीपणा :**

ग्रामीण दारिद्र्य व अन्य आर्थिक समस्यांमध्ये भर घालणारा घटक म्हणजे ग्रामीण कर्ज बाजारीपणा होय. ग्रामीण लोकामध्ये कर्ज काढण्याचे प्रमाण मोठे आहे. दारिद्र्य धारणक्षेत्र लहान असणे आणि छुप्या व हंगामी बेकारीचे मोठे प्रमाण यामुळे ग्रामीण शेतकऱ्यांना शेतीपासून पुरेसे उत्पन्न मिळू शकत नाही. त्यामुळेच त्याला कर्ज काढण्याची वेळ येते.

ग्रामीण भारतातील कुटूंबे वेगवेगळया मार्गांनी कर्ज काढतात ते मार्ग पुढीलप्रमाणे.

**अ) शासन :**

दुष्काळ, पुर, वाईट हवामान, नैसर्गिक आपत्ती इत्यादी मुळे शेतीला जेव्हा मोठा फटका बसतो तेव्हा सरकारकडून आर्थिक मदत मिळते. शेतीसाठी मिळणारी 'तगाई कर्जे', अर्ज कागदपत्रांच्या व चौकशांच्या कटकटीमुळे तसेच नोकरशाहीतील विलंब, लाचलुचपत यामुळे फारशी गेली नाहीत.

**ब) सहकारी पतसंस्था :**

अलिकडच्या काळात, ग्रामीण भागातील कर्जे मोठया प्रमाणावर सहकारी पतसंस्थामार्फत वितरीत केली जातात. अगदी छोटया छोटया खेडयामध्ये सुध्दा या पतसंस्था पोहोचलेल्या आहेत. तसेच पतसंस्थांचा ग्रामीण कर्जातील वाटा वाढतो आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

**क) शेतकरी सावकार :**

मोठे शेतकरी, जमीनदार हे गावकऱ्यांना बऱ्याचवेळा कर्ज पुरवठा करतात. प्रामुख्याने गरीब, निरक्षर शेतकऱ्यांना मोठया दराने, आधी व्याज कापून घेऊन घर, शेती तारण ठेऊन कर्जे दिली जातात. पिढीजात संबंधीमुळे अशी कर्जे सहजासहजी मिळतात पण त्यामध्ये ग्रामस्थांची मोठया प्रमाणावर पिळवणूक होते.

**ड) सावकार :**

ग्रामीण भागात कर्ज देण्याबाबत सावकारांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. कर्ज वितरणात त्यांचा वाटा मोठा असतो. हे व्यावसायिक सावकार, अनुत्पादक गोष्टीत देखील (उदा. लग्न, धार्मिक विधी, निर्वाह इ.) कर्ज देत असल्यामुळे व सहज सोपेपणाने कर्ज मिळत असल्यामुळे शेतकरी अशा खेडयात आजही सावकाराकडून कर्ज घेण्याचे प्रमाण मोठे आहे, पण असे कर्ज देताना पिळवणूक जमिनी हडप करणे, जादा व्याज दर उकळणे, फसविणे इत्यादी गैर प्रकार होत असल्यामुळे सावकारीवर अलिकडे कायदेशीर बंधने लादली जात आहेत.

सततच्या कर्जबाजारीपणातून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्येचे मोठे प्रमाण दुर्लक्षीत करता येत नाही.

**इ) इतर मार्गाने कर्ज पुरवठा :**

नातेवाईक, व्यापारी, कमिशन एजंट, व्यापारी बँका यांच्या कडूनही ग्रामस्थांना कर्जपुरवठा होतो. अनावश्यक कर्ज काढणे, कर्जाची परतफेड न होणे, सतत कर्जाच्या जाळयात अडकणे अशा कर्जासंबंधीच्या समस्या ग्रामवासीयांना भेडसावतात.

**फ) मुलभूत सोयींची कमतरता :**

आर्थिक विकासासाठी काही मुलभूत सोयींची आवश्यकता असते. रेल्वे निरंतर वीजपुरवठा, पाणीपुरवठा, शैक्षणिक संस्था, आरोग्यविषयक सेवासुविधा, पक्के रस्ते, बाजारपेठा या मुलभूत सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने ग्रामीण मनुष्यबळ विकासाला मर्यादा पडतात.

**ग) मानवी संसाधनाचा निकृष्ट दर्जा :**

मानवी गुणवत्ता ही शिक्षण आरोग्य, कौशल्ये, यांच्या आधारावर मोजली जाते. भारतातील मानवी गुणवत्ता किंवा साधन संपत्तीचा दर्जा निकृष्ठ आहे. विशेषत: ग्रामीण भागात कुपोषण मोठया प्रमाणावर होते. जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे औषधे, आरोग्य, सुविधांच्या अभावामुळे आरोग्यमान समाधानकारक नाही. ग्रामीण शिक्षणही सर्वांपर्यंत पोहोचलेले नाही. जेवढया प्रमाणात दारिद्र्य आहे. तितक्याच प्रमाणात म्हणजे ४०% निरक्षरताही आहे. व्यवसाय कौशल्ये अविकसीत, अप्रगत आहेत. स्त्रियांचे कार्यक्षेत्रही केवळ घरापुरते मर्यादित असल्याने मानवी साधन सामुग्रीचा यात अडथळे निर्माण होतात.

निरक्षरता, अज्ञान यांच्या जोडीला अंधश्रध्दा, जुनाट रुढीपरंपरा, जातिभेद, लिंगभाव विभेद, प्रतिगामी वृत्ती, यासारख्या सामाजिक-सांस्कृतिक घटकांनी देखीइल ग्रामीण समाजाची, उत्पादनशीलता, विकास प्रक्रिया काहीशी संथ व अडचणीची बनली आहे.

**५. विकासातील विषमता :**

प्रगत क्षेत्र आणि प्रगत लोक व मागास क्षेत्र आणि मागासवर्गीय यातील दर्जा दूर करणे हा खरे तर विकास कार्यक्रमांचा मुख्य हेतू आहे पण आपण जेव्हा या विकास कार्यक्रमांचा परामर्श घेतो. तेव्हा आपल्याला याची जाणीव होते की, त्यातील हेतू कुठेच सफल होत नाही. यातील आदर्श हेतू बाजूलाच पडतो आणि मागास प्रभाग अधिकच मागास आणि दुर्लक्षित राहिलेले दिसतात. याउलट प्रगत भाग अधिक प्रगत आणि प्रगत लोक अधिक प्रगती पथावर दिसतात.

**६. स्तरीय विभाजन :**

आर्थिक बाबतीत विचार केला तर भारतातील बहुतांश खेडयात गरीब-श्रीमंत असा फारसा फरक दिसत नाही. स्तरीकरण खेडयात आढळते. त्यामध्ये श्रीमंत-गरीब असे निखळ विभाजन प्रत्ययास येत नाही. तथापि धर्म आणि परंपरा ही खेडयामध्ये असमानतेचा निकष ठरतो. त्याचबरोबर विकास प्रकल्पातून खेडयामध्ये गरीब

आणि श्रीमंत असा भेद करण्यात आला. उच्च जाती व कनिष्ठ जातीतील फरक विकास प्रक्रियेतून पुढे आला. बहुतांश विकास प्रकल्प हे खेडयातील तथाकथित श्रीमंताच्या वाटयालाच आले अशा प्रकल्पातून आणि विकास कार्यक्रमातून जाती-जमाती, वर्ग व्यवस्था निर्माण केली. विकास कार्यक्रमांनी नवीन वर्गरचना निर्माण करण्यास मदत केली. परंतु पारंपारिक जाती रचना मात्र जशीच्या तशीच राहिली. त्यात काहीच बदल झाले नाहीत.

**७. नागरीकरणाला पोषक व पुरकता निर्माण केली :**

ग्रामीण विकास कार्यक्रमांनी नवीन संरचना निर्माण केली अथवा नवीन पायाभूत रचना निर्माण केली आणि अनेकांनी अशा विकास कार्यक्रमाचा लाभ घेतला. या विकासातून ग्रामीण परिवर्तनाला एक दिशा दिली. काही खेडयांचे रुपांतर शहरात झाले. अशा विकास कार्यक्रमातून अनेक खेडयांना त्यांचे नागरीकरण होण्यास पुरेसे प्रोत्साहन आणि आवश्यक ती पायाभूत सुविधा प्राप्त करुन दिली. एकदा असे रुपांतर शहरात होण्यास सुरुवात झाली काही लोकांच्यात मग मोठया शहरात जाण्याची प्रवृत्ती निर्माण होते. उदा. चार, पाच आणि सहा दर्जाच्या शहरात राहणाऱ्या लोकांचे जे प्रमाण १९०१ मध्ये ४७.२% होते ते १९९१ मध्ये केवळ १०.७ इतके कमी झाले. ही आकडेवारी हेच स्पष्ट करते की, ग्रामीण विकास कार्यक्रमानी ग्रामीण भागातील लोकांना तिथेच राहण्यास प्रवृत्त करण्याऐवजी ग्रामीण भागातील लोकांना शहराकडे सरकरण्यास वाट मोकळी करुन दिली. त्यांना एक प्रकारे त्यासाठीच प्रोत्साहन दिले.

**८. ग्रामविकास कार्यक्रम: एक मोठ अपयश :**

समुदाय विकास प्रकल्प जेव्हा १९५२ मध्ये कार्यान्वित करण्यात आले तेव्हापासून अनेक ग्रामविकास कार्यक्रमावर कोटयावधी रुपये खर्च करण्यात आले. फार मोठया प्रमाणात या कार्यक्रमांच्या अंमल बजावणीसाठी अधिकार वर्गही तैनात करण्यात आला. राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, ग्राम अधिकारी,अभियंते असे सर्वच हे कार्यक्रम व योजना राबविण्यासाठी गावपातळीवर प्रयोग करण्यास सज्ज झाले. अशा योजना आणि प्रकल्पातून काही तरी चमत्कार घडेल अशी आशा करुन ग्रामीण भागातील भाबडे लोक आशेवर जगत होते. पण यातील विरोधकास या विकास कार्यक्रमातून अनेकांची घोर निराशा केली आणि अगदी मुठभर लोकांना समृध्दी प्राप्त करुन दिली. जे कोटयावधी रुपये खर्च करण्यात आलेल्या पैकी अगदी मोजकेच गरजुंच्या हाती पडले. त्यामुळे विकासाची फळे सर्वांना मिळाली नाहीत. विकासाची गंगोत्री सर्वांपर्यंत पोहोचू शकली नाही.

**मूल्यमापन :**

वरील विवेचनापासून हे स्पष्ट होते की, ग्रामीण विकास कार्यक्रम हे आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यात अनेक बाबतीत अपयशी ठरले याचा अर्थ असा नव्हे की, या कार्यक्रमातून काहीच निष्पन्न झाले नाही किंवा त्याला काहीच यश मिळाले नाही. याबाबतीत एक मात्र स्पष्ट आहे की, या कार्यक्रमास जेवढा पैसा व वेळ खर्च केला गेला त्याच्या तुलनेत समाधानकारक असे उत्तर मिळू शकले नाही.

सर्वसाधारणपणे, या कार्यक्रमातून ग्रामीण लोकांमध्ये अशी समजूत शासनाने निर्माण केली की ग्रामीण

भागासाठी शासनाला काही तरी करायचे आहे. लोकांच्या मनात, सामाजिक, राजकीय जाणीव या कार्यक्रमातून करुन देण्यात आली. पंचायत राज पध्दतीने ग्रामीण लोकांच्या सक्षमीकरणाची भावना निर्माण करुन देण्यात आली, तसेच उज्वल भविष्याचे स्वप्न दाखविण्यात आले. पिळवणूक करणाऱ्या जमिनदारी पध्दतीचा विनाश करण्यात आला. अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्णता निर्माण करण्यात आली. अनेक तरुण-तरुणींना रोजगारांच्या संधी निर्माण करुन देण्यात आल्या. कमकुवत घटक अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना विकास कार्यक्रमातून प्राधान्य देण्यात आले. त्यांची पिळवणूक कमी करण्यात आली. प्रगत आणि मागास जातीत जरी तेढ राहिली असली तरी कमकुवत वर्गाला कायदयाचे पाठबळ मिळण्याची आशा निर्माण झाली. शहराकडे जाण्याचा मार्ग अशा विकास कार्यक्रमातून निर्माण झाला. वीज, पाणी, आरोग्य, परिवहन, शिक्षण, बँक व्यवसाय, समुदाय केंद्र, वाचनालय, पोस्ट सुविधा, सहकारी संस्था, टेलिफोन अशा अनेक गोष्टी या विकास कार्यक्रमातून निर्माण करण्यात आल्या. तरीही अजून बराच पल्ला गाठावयाचा आहे. ग्राम स्वयंपूर्णता हे अजूनही स्वप्नच आहे. त्यामुळेच गांधीजींचे 'ग्राम स्वराज्य' आणि 'रामराज्य' ध्येय खूपच दूर आहे. त्यासाठी सर्वांचा हातभार, लोकांचा सहभाग आवश्यक आहे.

एकात्मिक ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी, समर्पित असे राजकीय नेतृत्व असणे आवश्यक आहे. उत्तरदायी प्रशासन यंत्रणेची साथ गरजेचे आहे. ज्यांच्यासाठी हे कार्य होत आहे त्या ग्रामीण समुदायाचा उत्स्फूर्त सहभाग महत्वाचा आहे. तसेच त्यासाठी एक विशिष्ट व्यूहरचना आणि संख्यात्मक बदलही आवश्यक ठरतात. पण सर्वात महत्वाचा घटक म्हणजे लोकसहभाग म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी 'सबका साथ -सबका विकास' घोषणा केली आहे ती सार्थ वाटते. त्यालाच समाजशास्त्रीय भाषेत आपण समावेशक (Inclusive development) विकास असे म्हणतो.तसेच ग्रामीण विकासाचा संबंध अनेकांतून येतो. नीती-निर्धारण करणारा वर्ग, नियोजनकार, प्रकल्पांची अंमल बजावणी करणारे लोक, सामाजिक संघटना, संशोधक, अभ्यासक इत्यादी या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नातूनच ग्रामीण विकास साधला जाणार आहे व त्यात येणारे अडथळे दूर केले जाणार आहेत.

### ४.२.२ जागतिकीकरण आणि ग्रामविकासातील प्रश्न

**(Globalisation and Rural Development Issures) :**

**अ) जागतिकीकरणाचा अर्थ :**

१९८० च्या दशकात जगामध्ये मोठी उलथापालथ झाली. परिणामी जागतिक अर्थ व्यवस्थित जे बदल झाले ते 'जागतिकीकरण' या नावाने ओळखले जातात. १९८० च्या दशकात जगात तीन महत्वाचे बदल झाले. त्यामुळे जगात एक नवीन पर्वच सुरु झाले. या तीन बदलांपैकी पहिला बदल म्हणजे सोव्हिएट युनियनच्या नेतृत्वाखालील देशाच्या गटाने अमेरिकेच्या गटापुढे शरणागती पत्करली, आणि खुद्द सोव्हिएट युनियनची झाली. दुसरा बदल म्हणजे तिसऱ्या जगातील देशांच्या अर्थव्यवस्था रसातळाला जाऊन तिसऱ्या जगातील देशांपुढे आर्थिक संकट उभे राहिले. तिसरा बदल म्हणजे खुद्द विकसित देशांच्या अर्थव्यवस्था संकटग्रस्त झाल्या. त्यांच्यापुढे स्थायी स्वरुपाची मंदी (Stagnation) निर्माण झाली. त्यामुळे १९८० च्या दशकातील

या महत्वपूर्ण घडामोडीनी जागतिकीकरणाची पार्श्वभूमी तयार झाली.

विकसीत देश मंदीच्या चक्रातून सुधारण्यासाठी नवीन बाजारपेठांच्या शोधात होते. त्याचवेळी तिसऱ्या जगातील देशांची भांडवली विकासाची मॉडेल्स संकटात सापडली होती. हे देश पाश्चिमात्य सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात पुर्णपणे अडकले होते. त्यामुळे विकसीत देशांना तिसऱ्या जगातील देशांना संकटात टाकणे सोपे होते. त्यांना हया देशांना त्यांच्या अर्थव्यवस्था पाश्चिमात्य भांडवलासाठी खुल्या करण्यास भाग पाडणे शक्य होते. याच सुमारास सोव्हिएट युनियनच्या साम्राज्यवादी गटाचा अस्त होत होता. चीनमध्ये सुध्दा भांडवलशाहीची पुर्नस्थापना झाली होती. पाश्चिमात्य भांडवलातून जगाच्या कानाकोपऱ्यात भांडवल गुंतवणूक करण्यास कसलीच भीती अथवा स्पर्धा उरली नाही. परिणामी, विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात साम्राज्यवादी देशाकडून तिसऱ्या जगाकडे भांडवलाचा प्रचंड ओघ चालू झाला. यालाच 'जागतिकीकरण' मानन्यात येवू लागले.

'बाजारीधिक्य' आर्थिक व्यवहार उत्तेजन, जलद दळण-वळणाच्या सोयी, माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव यामुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात कोणतीही वस्तू किंवा सेवा उत्पादन करणे अथवा विक्री करणे शक्य होते. त्यातूनच जागतिकीकरणाची संकल्पना विकसीत झाली.

जागतिकीकरणाला 'वैश्वीकीकरण' किव्वा 'भू मंडळीकरण' या पर्यायी शब्दानेही ओळखले जाते. तसेच जागतिकीकरण ही अशी एक प्रक्रिया आहे की आज जगभराच्या बहुतेक सर्व देशात पहावयास मिळते आहे. या प्रक्रियेच्या माध्यमातून संस्कृती, उद्योगधंदे यांचा विस्तार, तांत्रिक परिवर्तन इत्यादींचा अनेक देशात फैलाव होत होत आहे. तसेच या प्रक्रियेमुळे विभिन्न देशातील एतद्देशीय लोक (Indigenious People) एक दुसऱ्याच्या अधिक जवळ येत आहेत.

या दृष्टिकोनातून जागतिकीकरणाची व्याख्या आणि अर्थ समजावून घेणे महत्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या विविध व्याख्या तज्ञांनी स्पष्ट केल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख व्याख्यांचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येतो.

**जागतिकीकरणाची व्याख्या :**

१. **'जागतिकीकरण'** म्हणजे अ) उपभोग्य वस्तूंच्या समावेशासह सर्व वस्तूंवरील आयात नियंत्रणे हळूहळू रद्द करणे. ब) आयात जकातीचे दर कमी करणे. क) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण करणे होय.''

(Globlization menas, A) Gradual abolishment of import contrest over all items including consumpation goods B) Reducing the rate of import duty, C) Printing of the publish sector understandngs.)

२. अँथनी गिडन्स यांची व्याख्या :

''जागतिकीकरण' म्हणजे दूरवरील स्थानीयतेला जोडणाऱ्या जगभरातील सामाजिक संबंधाच्या विस्तारीकरणाची अशी प्रक्रिया आहे की ज्यातून कित्येक मैल अंतरावर घडणाऱ्या स्थानिक बदलांना आकार

देण्याचा प्रयत्न असतो.''

(Globlization can be definded as the interfication of world wide social relations which link distant locaties in such as way that, local happenings are by events overing many miles away and vice versa.)

अर्थात जागतिकीकरणाची प्रक्रिया फारच जटिल स्वरुपाची आहे. या प्रक्रियेच्या अंतर्गत आधुनिकीकरण, उत्तर आधुनिकीकरण, औद्योगिकरण आणि भांडवलवाद या सगळयांचाच समावेश होतो. तसेच जागतिकीकरण ही अटळपणे आपल्यापर्यंत आलेली प्रक्रिया असून ती स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही असे असले तरी, प्रत्येक देश, समाज हे जागतिकीकरण, मुक्त अर्थ व्यवस्था, उदारीकरण यांनी प्रभावित होत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास हा केंद्रबिंदू मानला तर जागतिकीकरण कितपत हितकारक आणि कितपत हानिकारक आहे हे तपासून पाहणे महत्वाचे आहे.

**ब) जागतिकीकरणातून निर्माण होणारे ग्रामविकासातील प्रश्न :**

जागतिकीकरण म्हणजे सर्व क्षेत्रात पाश्चिमात्यांचे अंधारानुकरण असा अर्थ सुरु होत आहे. एकूण जीवन पध्दतीवर पाश्चात्य मुल्यांचे आक्रमण होत आहे. जागतिकीकरणातून भांडवल, वस्तू व सेवा राष्ट्रांच्या भिंती ओलांडून जगभर पसरल्या पण तंत्रज्ञान मात्र विकसीत देशांनी आपल्या ताब्यात ठेवले. जागतिकीकरणात मान कल्याणापेक्षा पैसा मिळविणे महत्वाचे वाटते. हा एक प्रकारचा नवा साम्राज्य वादच आहे. देशाचा आर्थिक विकास कसा करायचा, कोणत्या गोष्टींना अग्रक्रम द्यावयाच्या याचा आराखडा जागतिक बॅंकेतील अर्थतज्ञ ठरवितात. आपल्या देशाने जागतिकीकरण, उदार अर्थव्यवस्थेचे प्रतिनिधीत्व करणारा 'गॅट करार' (GATT-General Agreement on Trade and Terriff) १९९०-९१ मध्ये स्वीकारला. तसेच जागतिक व्यापार संघटनेचा (Would trade organization) भारत एक सदस्य बनला. साहजिकच भारताने राष्ट्राराष्ट्रातील खुल्या व्यापाराचे सूत्र स्विकारले पण त्याचबरोबर जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेविधी, गॅट करार, डंकेल प्रस्ताव यांच्यमार्फत वेळोवेळी घातलेली बंधने व नियंत्रणेही भारताने स्वीकारावी लागली. त्याचे अनेक सकारात्मक व नकारात्मक परिणाम आज भारताला भोगावे लागत आहेत. या परिणामांची माहिती आपण पुढीलप्रमाणे घेणार आहोत. तसेच त्यातून विशेषत: ग्रामविकासाच्या संदर्भात जे प्रश्न उपस्थित झाले ते लक्षात घेणार आहोत. यातील काही महत्वाचे प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत.

**शेती क्षेत्रावरील परिणाम :**

१. गॅट करारावर सही करुन भारताने शेती, व्यापार, गुंतवणूक सेवा योजना इत्यादी क्षेत्रातील निर्णय नियमनांचा हक्क गमावला. गॅट करार, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांची बंधने स्वीकारावी लागली आणि संमिश्र कल्याणकारी अर्थ व्यवस्थेला तिलांजली मिळाली. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने गरीब कारागीर, अल्पभुधारक शेतकरी यांना मिळणाऱ्या विविध सवलती, सबसिडीज जवळपास बंद झाल्या. त्याचा फटका शेतकरी व कारागीरांना मोठया प्रमाणावर बसला. बहुसंख्य शेतकऱ्यांना शेती व्यवसायाकडे पाठ फिरवावी लागली. महागडी खते, युरिया, बि-बियाणे, खरेदी करुन नव्या तंत्राचा खर्च सोसून उत्पादन काढणे, कर्जाच्या दबावाने हतबल होणे,

त्यांच्या नशीबी आले. अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्तेचा मार्ग स्वीकारला. तसेच प्रगत राष्ट्रे आपापल्या देशात शेतकऱ्यांना मोठी सबसिडी देतात. त्यामुळे त्यांचे शेतकरी अल्पदरात शेतमाल विकू शकतात. भारतात मात्र सबसिडी राखल्यास, वाढविल्यास विरोध होतो. हे प्रगत राष्ट्रांचे धोरणही दुटप्पी व स्वार्थी वाटते.

शेतकऱ्यांचा विचार केला तर शेतीतील सुधारणांमुळे त्यांना जे थोडेफार फायदे मिळत होते ते नष्ट होऊन त्यांना भूमीहिनता, बेकारी, दारिद्र्य य प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. शेती हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. शेती उत्पादन हा राष्ट्रीय उत्पन्नाचा महत्वाचा घटक आहे. देशातील सुमारे सत्तर टक्के जनता शेतीवरच अवलंबून आहे. पण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे या क्षेत्रावर होणारे परिणाम केवळ शेतकऱ्यांच्याच दृष्टीने नव्हे तर भारतीय अर्थ व्यवस्थेच्या दृष्टीनेही महत्वाचे ठरत आहेत. १९९१ साली जागतिकीकरणाचे वारे सुरु झाला आणि त्यावेळेचे गॅटचे सहसंचालक आर्थद डंकेल यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार व शेतीसंबंधी अनेक धोरणे सर्व देशांना सक्तीने स्वीकारणे भाग पाडले. याचा विपरीत परिणाम सर्व शेती क्षेत्रावर झाला. डंकेल प्रस्तावानुसार पेटंटचा आग्रह धरण्यात आला. आयात राशीवरील बंधन आणि कर कमी केले, पण आपल्या धान्य उत्पादनाच्या दोन टक्के आयात करणे बंधनकारक ठरवले. त्यामुळे जास्त उत्पादन होऊनही साठे पडून राहू लागले. मुक्त आयातीबरोबर शेती उत्पादनावरील अनुदानात कपात केली पाहिजे असे डंकेल प्रस्तावात बंधन आले. डंकेल प्रस्तावामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरही परिणाम झाला. दारिद्र्य रेषेखालील कुटूंबानाच स्वस्तधान्य पुरवण्याच्या धोरणामुळे बहुसंख्य कष्टकरी, गरजू, निम्नमध्यम वर्ग वितरण व्यवस्थेबाहेर फेकला गेला. पाश्चात्य देशांनी प्रचंड अनुदाने देऊन निर्यात केलेल्या शेती मालामुळे भारतीय बाजारपेठा कोसळण्यास सुरुवात झाली. शेती क्षेत्रामधील सार्वजनिक भांडवली गुंतवणूकीस मोठया प्रमाणात कपात केल्यामुळे भारतीय शेती क्षेत्राचा विनाश ओढवला. तसेच शेतीवरील सर्व अनुदानामध्ये टप्प्या-टप्प्याने कपात केल्यामुळे छोटया शेतकऱ्यांचा विनाश संभवत आहे. परिणामी, अनेक छोटे शेतकरी आत्महत्या करु लागले. जागतिक व्यापार संघटनेच्या शेतीविषयक करारामुळे पाश्चात्य देशांना अनुदानित अन्नधान्याचे तिसऱ्या जगातील देशांच्या बाजारपेठा भरुन टाकणे शक्य झाले. त्याचवेळी राजकोषीय तूट भरुन काढण्याच्या नावाखाली तिसऱ्या जगातील देशांना मात्र शेतीवरील सर्व सरकारी मदत बंद करण्यासाठी दबाब आणला जात आहे. हया दोन्ही छोटया शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणाऱ्या आहेत. असंघटीत शेती क्षेत्राला मोठया प्रमाणात अनुदाने मिळालेल्या विकसीत देशामधून आयात केलेल्या वस्तूंमध्ये स्पर्धा करावी लागणार आहे. शेती व्यवसायातील भांडवली गुंतवणूक कमी होत चालली आहे. याचा दुष्पपरिणाम सिंचन आणि इतर शेती सुधारणांमधील गुंतवणूकीवरही झाला आहे. आर्थिक सुधारणा सुरु झाल्यापासून आतापर्यंतच्या केंद्र सरकारांनी खते, सिंचने, वीज पुरवठा यावरील अनुदानामध्ये कपात करायला सुरुवात केल्यामुळे उत्पादन खर्च सतत वाढतच आहे. साम्राज्यवादी भांडवलाच्या चहुबाजूंनी होणाऱ्या अग्रक्रमाने भारतातील शेती क्षेत्रावरील हया हत्यामुळे भारतीय शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची होत आहे.

**२. स्पर्धात्मक प्रश्न :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विदेशी अन्नधान्य, दूध, दुग्धजन्य पदार्थ भारतात येवू लागले आहेत. त्यांच्यामध्ये स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांना सद्य:स्थितीत शक्य नसल्याने शेती व शेतीपुरक जोडधंदे उध्वस्त

होतील. जमिनी विकून मजुरी करावी लागेल. सहकार, लघुउद्योग क्षेत्रातील उद्योगधंदे भुईसपाट होतील. भारतातील सहकारी सूत गिरण्या, साखर कारखाने यांच्यापुढेही अस्तित्वासाठीचा संघर्ष निर्माण झाला आहे. ग्रामीण नागरी विषमतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**३. नवीन वर्ग निर्मिती :**

ग्रामीण भागात शेतमालाची निर्यात करुन अत्यंत सधन शेतकऱ्यांचा वर्ग निर्माण झाला. त्यांचे राहणीमान उंचावले. मात्र बहुसंख्य खेडूतांच्या राहणीत फारसा फरक पडला नाही. ग्रामीण वर्गामधील अंतरही वाढले. विषमता वाढली. ग्रामीण भागातील समानतेवर आधारीत एकसंधता कमी होऊ लागली.

**४. पर्यावरणाचा प्रश्न :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण पर्यावरण, निसर्ग आणि त्यावर अवलंबून असणारे यांनाही धोका पोहोचला आहे. वीजकेंद्रे, कारखाने, विषारी किटकनाशके, तृणनाशके यांच्या भरमसाठ प्रदूषण वाढून जीवनसृष्टीला धोका निर्माण झाला आहे.

**५. आरोग्य सेवेवरील परिणाम :**

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य यांचे व्यवस्थापन करणे हे शासनाचे प्रमुख काम असते. जागतिकीकरणाच्या नावाखाली या जबाबदाऱ्या टाळण्याकडे प्रवृत्ती वाढू लागली आहे. आरोग्य सेवांचेही खासगीकरण करुन गरिबीच्या आरोग्याची जबाबदारी शासन व्यवस्था झटकून टाकताना दिसत आहे. आरोग्य शिक्षण हा आता नफे-बाजीचा व्यवसाय झाला आहे. आरोग्य सुविधांच्या खाजगीकरणाचा मोठा फटका ग्रामीण गरीबांना होत आहे. अनेक परदेशी विमा कंपन्या भारतीय बाजारपेठेत उतरत आहेत. हेल्थ इन्शुरन्सच्या नावाखाली आरोग्याचीच परवड होत आहे. ग्रामीण आरोग्यांचा हा फार गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

**६. आरोग्य सेवेवरील परिणाम :**

जागतिकीकरण व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रवेशामुळे भारतातील लघुउद्योग व ग्राम उद्योगांचाही नाश होत आहे. १९९१ साली सुरु झालेल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर लघु उद्योग संकटात सापडले आहेत. सार्वजनिक क्षेत्राला मिळणाऱ्या अपुऱ्या निधीमुळे खाजगी उद्योग मंदीने ग्रस्त असल्याने लघु उद्योगांना त्यांच्याकडून मिळणाऱ्या मागणीला प्रचंड फटका बसला आहे. लघुउद्योग व ग्रामोउद्योगांना देण्यात येणारी सवलतीच्या व्याजदराची कर्जे बंद केली आहेत. मुक्त वित्तीय बाजारातून कर्ज घेणे दिवसेंदिवस त्यांना अवघड होत आहे. लघु व ग्रामोद्योगांना पाश्चात्य देशातील उच्च तंत्रज्ञानाने निर्माण झालेल्या उत्पादनाबरोबर स्पर्धा करावी लागत आहेत. अशा परिस्थितीमुळे असंख्य लघु व ग्रामोद्योग चालकांना आपले उद्योगधंदे बंद करावे लागत आहेत.

**७. असंघटीत क्षेत्रावरील परिणाम :**

एकूण कामगार संख्येतील फार मोठा वर्ग हा जेमतेम पोटापुरते मिळविणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, कोळी, गवळी तसेच पारंपारिक कारागीर, हातमाग, वीणकर यांचा आहे. जागतिकीकरणाने या करोडो लोकांच्यापुढे

जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## ८. मच्छिमारांचा प्रश्न :

जागतिकीकरणाचे वादे सुरु झाले आणि सारे सागर किनारे हादरु लागले. राज्या राज्यातले मच्छिमार संघटीत होऊ लागले. राष्ट्रीय पातळीवर संघटना उभारु लागले. जागतिक पातळीवर संपर्क साधू लागले. कारण जागतिकीकरणाने आज जे रुप आपल्यापुढे येत आहे ते नैसर्गिक स्त्रोत्रावरील आक्रमणाच आहे. जे निसर्गस्त्रोस्त्र आणि संपदा आजवर स्थानिक जनतेचे होते, ज्याच्या आधारे त्या समाजाने आपल्या जीवनाचा डोलारा उभारला आहे, त्या सधन स्त्रोत्रावरील त्यांचा हक्कच नाकारला जात आहे. हे स्त्रोत्र त्यांच्या हातातून हिसकावून घेतले जात आहेत. भारताच्या किनारपट्टीवर घोंघावत असणाऱ्या संघर्षाची कल्पना पुढील गोष्टीवरुन येऊ शकते.

- कोळंबी प्रकल्प आणि सीआरझेड कायद्यातील बदल (Lost of Regulation Zone)
- खोल समुद्रातील मासेमारी
- माशांच्या आयातीला परवानगी
- वाढवण बंदर विरोधी संघर्ष
- दाभोळ खाडी वाचवण्याचा प्रयत्न
- गोराई एस्सेल वर्ल्डविरोधी आंदोलन इ.

सीआरझेड कायद्यातील बदल, कोळंबी प्रकल्पांना मुक्त परवाना, महाकाय ट्रॉलर्सचा मुक्तसंचार यातून सागरी संपदा आणि त्याआधारे उभे राहिलेले जनजीवन उध्वस्त होत चालले आहे. दाभोळच्या एन्रॉन प्रकल्पाचे सोडलेल्या गरम पाण्याने मच्छिमारीसमोर मोठेच संकट उभे केले. तसेच समुद्रकिनाऱ्या लगत मच्छिमारी करायला परकीय यांत्रिक बोटींना परवानगी देणे, साठयापेक्षा जास्त मत्स्य उत्पादनांच्या आयातीवरील संख्यात्मक निर्बंध हटविणे यामुळे त्यांची मोठया प्रमाणावर आयात होईल आणि देशांतर्गत बाजारपेठेत माशांच्या किंमती धडाधड कोसळतील.

**मूल्यमापन :**

तेव्हा जागतिकीकरणाने गरीबतल्या गरीबाला आपल्या कक्षेत घेतले आहे. त्यांच्या तोंडचा घास काढून घेतला आहे. भारतातील असंघटीत क्षेत्रातील लाखोंचे रोजगार नष्ट तर केलेच शिवाय असंघटीत क्षेत्रातील कोटयावधी लोकांचे जीवनही उध्वस्त केले आहे. अन्नधान्यावरील अनुदानात मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली आहे. त्यामुळे गरिबांच्या मिळकतीचा सगळयात मोठा भाग ज्यावर खर्च होतो अशा अन्नधान्याच्या किंमती सतत वाढतच आहेत. हया सगळयांचा परिणाम विकास आणि गरिबी निर्मुलन यांची एकमेकांपासून फारकत होण्यास झाली आहे.

जागतिकीकरण टाळता येणे शक्य नसले तरी त्याची अनर्थकारकता कमी करण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. गरीब, ग्रामीण भागासाठी काही सुधारणा केल्यास जागतिकीकरण उपयोगी हितकारक ठरू शकते असा आशावादी निर्माण होऊ शकतो असे तज्ञांना वाटते. 'आपले हेच आदर्श जग' मानन्याची वृत्ती आपण सोडून

दिली पाहिजे असे डॉ. अमर्त्य सेन म्हणतात. अमर्त्य सेन हे आशावादी गटातील असले तरी सध्यातरी जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील परिणाम प्रामुख्याने निराशजनकच आहेत.

ग्रामीण भारतातील प्रचलित विकासातील त्रुटी घालविण्यासाठी पार्यायी, निकोप, चिरंजीवी विकासाची कल्पना मांडली. त्यात प्रामुख्याने ग्रामीण भागातील महत्वाची नैसर्गिक संसाधने वरिष्ठांच्या मक्तेदारीपासून वाचविणे, कुळांना जामिनीचे अधिकार देणे. ग्रामपंचायती-ग्रामसभांना सक्षम करुन त्यांना विकासाचे निर्णय घेण्याची मुभा देणे, स्वदेशी खतांचा वापर करणे, खेडीच स्वयंपूर्ण बनविणे, स्त्रिया मुळातच निसर्गाच्या रक्षक व संवर्धक असतात म्हणून पर्यायी विकासात त्यांना सहभागी करुन घेणे अशा उपायांचा अवलंब केल्यास बऱ्याचशा विकासाविषयक प्रश्नांची सोडवणूक होऊ शकेल.

## ४.३ सारांश :

देशाची प्रगती व विकास हा देशातील पायाभूत सुविधावर आधारित असतो. या पायाभूत सुविधांचे स्वरुप ग्रामीण व नागरी भागात वेगवेगळे असते. कारण दोन्ही भागांचे स्वरुपच मुळात भिन्न भिन्न असते. नागरी भागावर जेवढे लक्ष केंद्रीत केले जाते तेवढे ग्रामीण भागावर होताना दिसत नाही. वस्तुत: ग्रामीण भाग आणि शेती क्षेत्र हा देशाच्या विकासाचा कणा असतो पण नेमके याच ग्रामीण भागाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे जाते. ग्रामीण भागात दीर्घकाळापासून चालत आलेल्या काही पारंपारिक अशा समस्या आहेत. त्या समस्यांचे निवारण जोपर्यंत होत नाही तोपर्यंत ग्रामीण भाग हा अधिक राहणार हे एवढे असले तरी ग्रामीण भागाकडे ज्या आत्मीयतेने पाहणे गरजेचे आहे तसे पाहिले जात नाही वास्तव आहे.

ग्राम विकासाचे अनेक प्रकल्प, योजना, कार्यक्रम केंद्र व राज्य पातळीवर आपल्या देशात १९५६ पासून हाती घेतले आहेत. समुदाय विकास कार्यक्रम पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून राबविली जात आहे अशा विकास कामावर अब्जावधी रुपये खर्च केले जात आहेत. पण इतके होऊनही त्यामध्ये अनेक अडथळे आहेत. अशा सर्व अडथळयांचा समस्यांचा सविस्तर आढावा या भागात घेण्यात आला आहे. या सर्व समस्या दूर करुन ग्राम विकासावर अधिक तत्परतेने लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

जागतिकीकरण ही एक अशी शक्तीशाली प्रक्रिया आहे की, ज्यातून अस्तित्वात असणाऱ्या आणि परिवर्तीत होणाऱ्या समाजातील घटकांचे आव्हान स्वीकारण्याची क्षमता त्यामध्ये आहे. जागतिकीकरणामुळे जग एकात्म बनत आहे. जागतिकीकरणाने आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. तसेच जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, पर्यावरण, राहणीमान, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत असणारे परिवर्तन हेच असेही म्हणता येईल. तेव्हा ही प्रक्रिया फारच जटिल अशी आहे.

जगातील विविध देशांनी जागतिकीकरणाचा स्वीकार केला आहे. त्याचे जे फायदे आहेत त्यावरुन त्याचे महत्व आपोआपच अधोरेखित होते. हे जरी खरे असले तरी त्याचे जे परिणाम आहेत त्यांचाही विचार करणे तितकेच महत्वाचे आहे. विशेष करुन भारतीय समाजावर होणारे त्याचे विधायक व विघातक परिणाम समजावून घेणे महत्वाचे आहे.

भारताच्या संदर्भात विचार केला तर जवळपास सत्तर टक्के जनता ग्रामीण भागात राहते. शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. या शेती व्यवस्थेवर उदरनिर्वाहाच्या साधनावर आणि सरकारने ग्रामविकासाच्या ज्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. त्यावर जागतिकीकरणाचा होणारा परिणाम त्यातून निर्माण होणारे विविध सामाजिक, आर्थिक प्रश्न विचारात घेणे तितकेच महत्वाचे आहे. विकसित देश, त्यांचे तंत्रज्ञान, त्यांचा विकासाच्या कल्पना व योजना परंपरेवर आधारित भारतीय ग्रामव्यवस्थेवर व विकासावर लादणे कितपत योग्य आहे याचाही विचार झाला पाहिजे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून जे विकासाविषयक विविध प्रश्न भारतात ग्रामीण भागात निर्माण झाले आहेत. त्यांचा आढावा याठिकाणी सविस्तर घेतलाच आहे. त्यामुळे जागतिकीकरण प्रक्रियेवर किती अवलंबून रहायचे याचा विचार आपल्या समाजाच्या संदर्भात आपणच केला पाहिजे.

## ४.४ सरावासाठी प्रश्न

१. ग्रामविकासाची संकल्पना स्पष्ट करुन ग्रामविकासातील विविध समस्यांचा आढावा घ्या.

२. भारतातील ग्रामविकासातील प्रमुख समस्यांचे वर्णन करा.

३. ग्रामपंचायतील प्रमुख समस्यांचे मुल्यमापन करा.

४. जागतिकीकरणाचा अर्थ व स्वरुप स्पष्ट करा ?

५. जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करुन जागतिकीकरणातून निर्माण होणारे ग्रामविकासातील प्रश्नांचे विवेचन करा?

६. जागतिकीकरणातून निर्माण होणाऱ्या शेती क्षेत्रावरील प्रश्नांचा आढावा घ्या ?

७. जागतिकीकरण प्रक्रियेतून ग्रामविकासा संदर्भात निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांचा आढावा घ्या ?

८. ग्रामविकासा संदर्भात उद्‌भवणाऱ्या विविध प्रश्नांचे मूल्यमापन करा ?

## ४.५ अधिक वाचनासाठी संदर्भ


1) नाडगोंडे गुरुनाथ : ग्रामीण समाजशास्त्र, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे

2) पाटोळे दा. ना. : ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास, मंगेश प्रकाशन, नागपूर.

3) चुनखडे पाटील : ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

4) कराळे गंगाधर, विजय कविमंडन : ग्रामीण विकासातील एकात्मिक दृष्टिकोन, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

5) Doshi S. L. : Rural Socology, Rawat Publication, Jaipur.

6) Vahar U.R. : Socilogy of Rural Development, Rawat Publication, Jaipur.

७) देसाई भालेराव : कृषी अर्थशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे

८) महाजन मुकूंद : भारतीय अर्थव्यवस्था, भाग १, निराली प्रकाशन, पुणे


❑❑❑